छात्र
# प्रबोधन


निज ज्येष्ठ शके १९२१
वर्ष ७ अंक ११





ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी अभिनव मासिक!



# वेळापत्रक

| सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

## जेवणाची सुट्टी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**छात्र प्रबोधन**
ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी
अभिनव मासिक।

# अंतरंग


छात्र प्रबोधन

वर्ष ७ अंक ११
सौर ज्येष्ठ
शके १९२०



२ **संवाद** : प्रा. महेन्द्र सेठिया

३ **माझी वेधशाळा** : डॉ. अरविंद परांजपे

५ **कथा : कोपरा** : सौ. आश्लेषा महाजन

९ **मी कोण होणार? निर्णय कसा घ्यावा?** : डॉ. श्रीराम गीत

११ **कथा : तिची खंत :** श्री. निरंजन घाटे

१४ **कविता पानोपानी**
**तुझ्या मनात दया असू दे** : श्री. अरुण देशपांडे
**काळ्या काळ्या ढगा** : श्री पुरूषोत्तम जोशी

१५ **थांबला तो संपला** : चि. विवेक बुवा

१७ **कथा : सुबुद्धी–दुर्बुद्धी :** सौ. शुभदा गोगटे

२२ **खग्रास सूर्यग्रहण :** डॉ. प्रकाश तुपे

२५ **'ठसा' अभ्याससहलीचा :** सौ. बागेश्री पोंक्षे

२७ **ईश्वरचंद्रांची मातृभक्ती** : डॉ. सुरेश करंदीकर

२९ **एप्रिल–मे मधील व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरे**

३१ **छात्र प्रबोधन नोंदणी पत्रक व व्यावहारिक कौशल्य चाचणी–३**

३२ **जून महिन्याचा उपक्रम– वर्षारंभ समारंभाचे आयोजन**




इवली शल्ये रुपती खुपती,
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात


**संपादक, प्रकाशक**
महेन्द्र सेठिया

**संपादक मंडळ**
महेन्द्र सेठिया B.E., M.Ed.
शैलजा देशमुख M.A. M.Ed.
दत्ता श्री. टोळ B.A., B.COM.
विवेक पोंक्षे M.SC, B.Ed.

**मुखपृष्ठ व आतील चित्रे**
गिरीश सहस्त्रबुद्धे

**अक्षरजुळवणी**
प्रिंट लिंग, पुणे



**संपर्क पत्ता**
**'छात्र प्रबोधन'**
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ,
पुणे – ४११०३०
दूरभाष ०२१२–४७७६९१, ४७८०९५
Fax : ०२०–४४९१८०६
Email -jnana.jptrust@axcess.net.in



**प्रकाशन दिनांक**
राष्ट्रीय सौर १० श्रावण, शके १९२०
१ जून १९९९

**वर्गणी भारतात**
**वार्षिक :** रु.१२५/–**द्वैवार्षिक :** रू.२४०/–
**त्रैवार्षिक :** रु.३५०/–**आजीवन :** रु.२०००/–
**भारताबाहेर – वार्षिक :** ३० डॉलर


सरत्या ज्येष्ठाचं उन्ह, लहालहा तापलं रान, भुईला शोष तहान.

## अधिक मास का?

सूर्य आकाशातून फिरत आहे असे आपणास वाटते. प्रत्यक्षात पृथ्वी फिरते सूर्य नाही. सूर्याच्या या भासमान भ्रमणात एका राशी विभागातून दुसऱ्या राशी विभागात जाण्यास सूर्यास जो काळ लागतो त्याला 'सौरमास' म्हणतात. तो सुमारे ३० १/३ दिवसांचा असतो. म्हणून काही महिने ३० चे तर काही ३१ दिवसांचे असतात व सौरवर्ष ३६५ दिवसांचे असते. भारतीय पंचांग चंद्राच्या भ्रमणावर आधारलेले आहे. एक चांद्रवर्ष ३५४ दिवसांचे असते. त्यामुळे सौरवर्षापेक्षा ते ११ दिवसांनी लहान आहे. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे ऋतू सौरवर्षाप्रमाणे असतात. कारण ऋतूचा संबध सूर्याशी असतो तर बहुतांशी सणांचा संबध चंद्रशी असतो. विशिष्ट सण विशिष्ट ऋतूतच यावेत म्हणून चांद्रवर्ष व सौरवर्षाचा मेळ घालावा लागतो. चांद्रवर्षामुळे पडणारा ११ दिवसांचा फरक विचारात घेता तो भरून काढण्यास २ वर्षे ८ महिने या कालावधीत ३० दिवस या हिशोबाने १ महिना होतो, म्हणून भारतीय पंचांगात २ वर्षे ८ महिने या काळानंतर कालागणनेत एक जास्तीचा महिना धरतात, त्याला 'अधिक मास' म्हणतात.प्रत्येक चांद्रमासात यातील दिवसांच्या फरकामुळे एक चांद्रमास असा येते की त्यात सूर्याचे राशीसंक्रमण होत नाही. हा चांद्रमास अधिकमास मानतात व त्याला पुढच्या चांद्रमासाचे नाव देतात. चालू वर्षात ज्येष्ठ अधिकमास सध्या चालू आहे. तो १३ जूनला संपले व १४ जूनपासून निज ज्येष्ठ महिना सुरू होईल.


**ज्ञान प्रबोधिनी**
**शैक्षणिक उपक्रम संशोधिकेव्दारा**
**वर्ग** ८ ८ वी ते १० वीच्या मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांसाठी एक महिन्याचे खास प्रशिक्षण वर्ग

❖ लेखन कौशल्य ❖ वाचन कौशल्य
❖ इंग्रजी संप्रेषण वर्ग

प्रत्येक शनिवार- रविवार, दु. २ ते ५
( दर महिन्याला तीनही वर्ग चालू असतील.)

**प्रारंभ :** ३ जुलै , ७ ऑगस्ट
४ सप्टेंबर , ४ डिसेंबर
**शुल्क :** रू . २००/-
**स्थळ :** ज्ञान प्रबोधिनी, पुणे ४११०३०.

**अधिक चौकशीसाठी संपर्क :**
ज्ञानप्रबोधिनी, शैक्षणिक उपक्रम संशोधिका
५१० सदाशिव पेंठ, पुणे ३०.


*प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,*

*सुट्टी संपवून शाळा सुरू होण्याची तुम्ही सर्वजण वाट बघत असाल. नवीन पुस्तके, नव्या वह्या, अशी सगळी नावीन्याची हौस भागवत शाळा सुरू होईल. वर्गात नवीन कोणत्या मित्रांची / मैत्रिणींची भर पडतीये, याचेही कुतुहल असेल. अशा नवीन विद्यार्थ्यांशी चांगली दोस्ती करा. त्यांचे अधीच्या शाळेतील / वगातील अनुभव ऐकून घेत तुमच्यात सामील करून घ्या.*

*तुमच्या नवीन वर्गातील विद्यार्थ्यांचे सहज विश्लेषण करून तर बघा ! कोणी खेळामध्ये विशेष पुढे आहे, कोणी अभ्यासात पुढे आहे, कोणाकडे विशेष संग्रह आहेत, कोण गप्पा मारण्यात पटाईत आहेत, असं तुमच्या वर्गाचं छानसं चित्र कागदावर रंगवा/लिहून काढा.* ***वर्षाच्या सुरूवातीलाच वर्गाने मिळून काही गोष्टी ठरवायचा प्रयत्न करता येईल का?*** *उदा. आमचा वर्ग आम्हीच स्वच्छ ठेवू. वर्गात एखादे छोटेसे ग्रंथालय (वर्गातल्याच मुलांकडून पुस्तके एकत्र करून) चालवू. वर्ग मिळून शाळेच्या परिसरात/गच्चीवर छानशी बाग तयार करू. वर्ग मिळून शाळेच्या आवारातील काही झाडे दत्तक घेऊ. शाळेचे २ सूचनाफलक दत्तक घेऊ व तेथे उत्तम-उत्तम चित्रे, कोडी, लेख, सुविचार, विज्ञान प्रयोग, वैशिष्टयपूर्ण माहिती, कविता इ. नियमितपणे लावू.*

*मात्र यासाठी* ***छात्र प्रबोधनचे सभासद, प्रबोधक या नात्याने तुम्हीच पुढाकार घ्यायला हवा.*** *प्रारंभी सगळा वर्ग साथ देणार नाही. काहीजण थट्टा-टिंगलही करतील. पण मग जवळच्या २-४ मित्रांच्या मदतीने यातल्या काही गोष्टींना सुरूवात करून बघा. तुमची चिकाटी, तुमचे सातत्य पाहून हळूहळू अजून काही मित्र तुम्हाला येऊन मिळतील. त्यासाठी थोडी वाट पाहावी लागेल. पण यश मिळेल, असा विश्वास बाळगा.*

*तुम्ही असं काही करायचं ठरवलंत अन त्याप्रमाणे करायला सुरू वात केली, की आम्हाला जरूर कळवा. मी जेव्हा- जेव्हा दौऱ्यावर असताना तुमच्या भागात येईन, तेव्हा अशा धडपडणाऱ्या मुला-मुलींना भेटायला, त्यांच्याशी गप्पा मारायला मला नक्कीच आवडेल.*

*या अंकात सुचविलेला माझी वेधशाळा हा प्रकल्प येते वर्षभर अनेकांनी आवर्जून करावा. छात्र प्रबोधन हे मासिक तुम्हाला हवंहवंसं वाटतं ना, मग ते अनेकांपर्यंत पोहोचविण्याची खटपटही तुम्हीच करायला हवी, हो ना!* ***येत्या महिन्यात प्रत्येकाने किमान एकतरी नवीन सभासद मिळवायचाच,*** *असे ठरवून टाका अन् या अंकातील नोंदणीपत्रक वापरून सभासद करून घ्या. जास्तीची सभासद नोंदणीपत्रके हवी असल्यास, पोस्टकार्डवर कळवा. पाठविण्याची व्यवस्था करू.*

*बरंय तर मग!* ***नवीन शैक्षणिक वर्षाच्या खूप खूप शुभेच्छा!*** *या शैक्षणिक वर्षात भरपूर खेळा, मजा करा, नवनवीन अनुभव घ्या, स्वत:च्या क्षमतांचा विकास करा, अनेक मित्र जमवा, छान अभ्यासही करा, एकतरी कला आत्मसात करण्याचा प्रयत्न करा, एखादी भारतीय भाषा नव्याने शिका आणि असं बरंच काही ... तेव्हा या सर्वांसाठी शुभेच्छा!*

*तुमच्या प्रतिसादाची वाट पाहतोय.....! पुढचा अंक तर तुम्हा मुला -मुलींचाच आहे.*

*सस्नेह तुमचा*

*महेन्द्र सेठिया*




रोज दूरदर्शनवरच्या बातम्या पाहताना शेवटी आपण हवामानाचा अंदाज ऐकतो. आपणच अवकाशात सोडलेल्या उपग्रहाकडून जी प्रकाशचित्रे आपल्याला मिळतात त्याच्या आधारे वेधशाळा हवामानाचा काही अंदाज वर्तवत असते. याचे अगदी ताजे उदाहरण म्हणजे, नुकत्याच गुजराथच्या किनारपट्टीवर येऊ घातलेल्या चक्रीवादळाची कल्पना वेधशाळेने पुरेशी आधी दिल्याने, तेथील लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवता आले. पण देशाच्या स्तरावरील हवामानाच्या अंदाजात, आपल्या गावातील हवामानाची तपशीलवार माहिती मिळेलच असे नाही. त्यासाठी मोठ्या शहरांमध्ये 'वेधशाळा' असतात. त्या स्थानिक स्तरावर हवामानाची नोंद करत असतात अन हवामानाचा अंदाजही वर्तवत असतात. या वेधशाळांमध्ये मोठमोठी उपकरणे अन् अनेक प्रशिक्षित व्यक्ती, शास्त्रज्ञ, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून, हे काम करत असतात. हे सर्वजण हे काम करत असताना, आपली स्वत:ची वेगळी वेधशाळा कशासाठी? आणि खरंच आम्हा विद्यार्थ्यांना ते जमेल का? असे प्रश्न तुमच्या मनात येणं स्वाभाविक आहे.


या वेधशाळेने वर्तवलेला अंदाज, हा सुध्दा एक मोठा भूभागासाठी असतो. बऱ्याचवेळा आपल्याला असं दिसून येतं की, शहराच्या एका भागात जोरदार पाऊस कोसळतोय अन दुसऱ्या भागात छान, स्वच्छ सूर्यप्रकाश आहे. मग अशावेळेला, त्या शहरातल्या पाऊस न पडणाऱ्या भागात वेधशाळा असली तर शहरात इतरत्र पाऊस पडूनही ती तो नोंदवणार नाही. तेव्हा छोट्या छोट्या भागांमध्ये तुमच्यासारख्या धडपडणाऱ्या विद्यार्थ्यांनी, जर अशा छोट्या छोट्या वेधशाळा उभ्या केल्या; अन् हवामानाच्या विविध घटकांच्या अचूक नोंदी ठेवायला सुरूवात केली, तर अजून २-५ वर्षांना या नोंदींच्या आधारे, अन् हवामान शास्त्राचा अभ्यास करून, तुम्ही तुमच्या भागातील हवामानशास्त्रज्ञ होऊ शकाल. शिवाय ही वेधशाळा तयार करताना, विज्ञानातील अनेक संकल्पनांचा तुम्हाला वापर करावा लागेल. छोटी छोटी उपकरणे स्वत:च तयार करून त्याआधारे अचूक निरीक्षणे नोंदवावी लागतील. या नोंदी सातत्याने, चिकाटीने घ्याव्या लागतील. व नोंदवलेली निरीक्षणे आलेख, तक्ते या स्वरूपात मांडून पाहावी लागतील. तुमच्या निरीक्षणाची, स्थानिक वेधशाळेच्या नोंदीशी तुम्ही तुलना करू शकाल. या सर्वांतून तुमच्यातील शास्त्रज्ञ हळूहळू जागा होईल अन तोच तुम्हाला पुढे विविध क्षेत्रातील मोठमोठे शोध लावायला प्रवृत्त करेल.

तेव्हा आता तयार आहात ना तुमची स्वत:ची वेधशाळा उभारायला! यासाठी फार पैशांचीही गरज नाही, अगदी साध्या घरगुती, प्रसंगी टाकाऊ वस्तूतूनही वेधशाळेची उपकरणे कशी तयार करायची? ते आपण पाहणार आहोत. तुमची वेधशाळा उभी कण्यासाठी प्रथम सुयोग्य जागा शोधावी लागेल. वेधशाळेला अडथळा होणार नाही अशी जागा असावी. उदा. सभोवताली गच्च झाडी, इमारती इत्यादींनी वेढलेली जागा असू नये. सूर्यप्रकाश, वारा, पाऊस यांना थेट यायला जेथे अडथळा होणार नाही, अशा ठिकाणी वेधशाळा उभी करता येईल. तुमच्या घराची/शाळेची गच्ची यासाठी तुम्ही वापरू शकाल. मात्र तेथे तुमची उपकरणे सुरक्षित राहतील अन तुमच्याशिवाय दुसरं कोणी त्याला हात लावणार नाही, याची काळजी तुम्हाला घ्यावी लागेल.

हवामानाबाबतच्या नोंदी करायच्या म्हणजे तापमान,आर्द्रता,हवेचा दाब,वाऱ्याचा वेग व दिशा, पाऊस, अभ्राच्छादित आकाश इ. सर्व घटकांच्या नोंदी करायला हव्यात. पण आपण एकदम सगळ्यांच्या नोंदी ठेवायला सुरूवात करणार नाही. क्रमाक्रमाने दर महिन्याला एकेका उपकरणाची भर आपण आपल्या वेधशाळेत घालणार आहोत.

जून महिना म्हणजे पावसाची सुरूवात. म्हणून आपण पाऊस मोजण्यासाठी 'पर्जन्यमापक' कसा तयार करायचा, त्याआधी पाऊस कसा मोजायचा, अन् त्याच्या नोंदी कशा ठेवायच्या? हे आता पाहू.

पाऊस मोजणं हे तसं अगदी सोपं आहे. एखादे एकसमान आडव्या छेदाचे भांडे ( निमूळते किंवा फुगीर नसलेले, ज्याच्या तोंडापासून बुडापर्यंत कुठेही आडवा छेद घेतला तर, त्याचे क्षेत्रफळ सारखेच येईल, असे लंबावृत्तचितीसारखे) उभे ठेवल्यावर त्यामध्ये साठलेल्या पाण्याची उंची म्हणजे, त्यावेळी पडलेल्या पावसाचे मान होय. जोपर्यंत भांड्यांचा आडवा छेद पूर्णपणे समान आहे. तोपर्यंत भांडं कुठल्याही आकाराचे असले तरी पर्जन्यमापनात फरक पडणार नाही.




१. बाटलीचा कापलेला वरचा भाग, २. प्लॅस्टीक वा रबर गास्केट, ३. मेण व राळ यांचा थर, ४. धातूची मोजपट्टी

या तत्त्वाच्या आधारे पर्जन्यमापक तयार करण्याची सोपी पध्दत म्हणजे, एक रिकामी,पारदर्शक, काचेची बाटली घेऊन, तिच्या वरच्या तोंडाकडचा निमूळता होत,जाणारा भाग (साधारण एक तृतीयांश भाग) कापून टाकावा. तापवलेली नायक्रोमची तार बाटलीला गुंडाळून बाटलीची काच कापत येते. जवळपासच्या काचेच्या दुकानातून यासाठी आवश्यक ती मदत घ्यावी.

आकृतीत दाखवल्याप्रमाणे, बाटलीचा कापलेला वरचा भाग उलट करून कापलेल्या बाटलीच्या तोंडाशी बसवावा. हा भाग हलू नये म्हणून, शक्य असेल तर बाटलीला प्लॅस्टिक किंवा रबराच्या गास्केटचा आधार द्यावा. बाटलीचा तळ बहुदा सपाट नसतो. त्यामुळे पाऊस मोजताना चूक होण्याची शक्यता असते. बाटलीचा तळ सपाट करण्यासाठी तळाशी, ५०% मेण व ५०% राळ एकत्र करून तो तापवून, त्याचा एखादा सें.मी.चा थर बाटलीच्या तळाशी द्यावा. त्यानंतर प्लॅस्टिक वा धातूची मोजपट्टी बाटलीच्या खालच्या भागाला, आकृतीत दाखविल्याप्रमाणे चिकटवावी. मोजपट्टीवर शून्यअगोदरचा असलेला भाग कापून टाकावा व मगच ती बाटलीवर चिकटवावी. म्हणजे निरीक्षणात अचूकता येईल .

अशातऱ्हेने तयार झालले पर्जन्यमापक मोकळ्या जागेवर ठेवावे. म्हणजे त्यात पावसाचे थेंब जमा होतील. पाऊस पडल्यानंतर बाटलीतील पाण्याची उंची मोजा. ही पाण्याची उंची, हेच त्यावेळचे पर्जन्यमापन होय.

हे तयार केलेले उपकरण, एखाद्या डब्यात ठेवावे व त्याला आजूबाजूने योग्य आधार द्यावा, म्हणजे जोरदार वाऱ्याने ती बाटली पडणार नाही. शिवाय तुम्ही ठेवलेल्या पर्जन्यमापकात, जमिनीवर पडणारे पावसाचे पाणी उडणार नाही किंवा छताचे, झाडाच्या पानांचे पाणी ठिबकणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. नोंदी करताना दिवसातून एका विशिष्ट वेळ नोंद करावी, रोज किमान एकदा अन् शक्य झाल्यास दोनदा पावसाची नोंद करावी . नोंदी ठेवण्यास वही अथवा छोटी डायरी करावी किंवा खाली दाखविल्याप्रमाणे,पंधरवड्याचे एक नोंदपत्र तयार करून यात अचूक नोंदी ठेवाव्यात.'टीप' या स्तंभात काही विशेष नोंदी, काही घोटाळा, चुका झाल्या असल्यास, त्याचीही नोंद करावी. पाण्याच्या उंचीची नोंद केल्यावर, पर्जन्यमापकातील पाणी टाकून ते रिकामे करून परत योग्य त्याठिकाणी ठेवावे.

वेधशाळेचे नाव व पत्ता

एका आठवड्याच्या नोंदींचा आलेख काढून तो सूचनाफलकावर लावावा

वरील पर्जन्यमापकामध्ये बाटलीचा आडवा छेद सर्वत्र समान आहे. पण तसे असायची गरज नाही. फक्त पाणी साठवलेल्या बाटलीच्या तोंडाचे

वेधशाळेचे नाव व पत्ता

अक्षांश........ रेखांश........ उंची (समुद्रसपाटीपासून).......
महिना........ निरीक्षकाचे नाव :

| तारीख | निरीक्षण घेण्याची वेळ | पर्जन्यमान | टीप |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| । | | | |
| । | | | |

(आकृतीत नरसाळ्याच्या तोंडा जवळील भागाचे) क्षेत्रफळ आणि साठलेल्या पाण्याचे आकारमान ( साठलेले पाणी मोजपात्रात घेऊन त्याचे आकारमान काढता येईल.) माहिती असेल तर खालील सूत्राच्या आधाराने किती पाऊस पडला ते मोजता येईल.

पाऊस (मि.मि.) = साठवलेल्या

$$\text{पाऊस (मि.मि)} = \frac{\text{साठलेल्या पाण्याचे आकारमान(मि.लि.)}}{\text{बाटलीच्या/नरसाळ्याच्या तोंडाचे क्षेत्रफळ(वर्ग मि.मि.)}}$$

पाण्याचे आकारमान

बाटलीच्या/ नरसाळ्याच्या तोंडाचे क्षेत्रफळ (वर्ग मि.मि.)

अशाप्रकारे तुमच्या वेधशाळेतील पहिले उपकरण तयार करून हवामानातील एक घटक 'पाऊस' याचे मोजमाप करायला, अन् त्याच्या नियमित व अचूक नोंदी ठेवायला सुरूवात करा. पुढील अंकांमध्ये क्रमश:एकेका उपकरणाची भर वेधशाळेत कशी घालायची? हे आपण पाहू .

ज्यांनी ज्यांनी अशी स्वत:ची वेधशाळा करायचे ठरवले आहे व त्यादृष्टीने पर्जन्यमापक तयार करून नोंदी ठेवायला प्रारंभ केला आहे त्यांनी छात्र प्रबोधनच्या किंवा लेखकाच्या पत्त्यावर एक पोस्टकार्ड टाकून कळवावे. तसेच तुमच्या सर्व नोंदी व आलेखही वेळोवेळी वेधशाळा परिपूर्ण करण्यासाठी मार्गदर्शन व साहाय्य केले जाईल. त्यांनी आपले नाव,पत्ता, शाळा, इयत्ता आपल्या पत्रावर लिहावे. काही शंका,अडचणी असल्या तरी नि:संकोचपणे

**{dMaïr rV. तुमच्या वेधशाळेला अन् तुमच्यातील शास्त्रज्ञाला विशेष धडपडीसाठी आमच्या मन:पूर्वक शुभेच्छा!**

❖ ❖ ❖


**– डॉ. अरविंद परांजपे**
'आयुका' पुणे विद्यापीठ आवार,
पुणे – ४११ ००७.



# कोपरा

आश्लेषा महाजन

एस्.टी मध्ये माणसं खचाखच भरली होती. त्यात खेडूत होते , तसे शिकले - सवरले लोकही होते, हे सदानंदाला जाणवलं. अगदी सदानंदाला खेटून बसलेला माणूसही सभ्य म्हणता येईल, असाच होता. तो गावातला चांगला प्रतिष्ठित असावासा भासत होता. गाडी आणि माणसांच्या गोंगाटातही त्यांचं संभाषण चालू होतं.

Xhm~nandf n@JndnV I ynM gWnaUmPnë`m eVrV gWnaUm Pnë`mAn{U _w` åhUOœnm.

en nhenm H$er Anh? H$n H$n àJVr H$r enm Z§ dX{VJ# Pnb§H$n? An{U _w` nYmH${XKo ga, na§no~nB©eXoga, JWa~nB© gd@AnhV Zn?

सदानंदाने प्रश्नांची सरबत्ती केली. त्याच्या डोळ्यांच्या कडा पाणवल्या होत्या आणि कान उत्तरासाठी आतुरले होते. त्या गृहस्थाने सदानंदाकडे आश्चर्याने पाहिले व ते शांतपणे म्हणाले,

शाळेत तर खूपच सुधारणा झाल्या. पाच वर्षांपूर्वीच वसतिगृह झाले. सध्या ५० मुलं त्याचा लाभ घेतात. शाळेत पूर्वी चांगली प्रयोगशाळा नव्हती, आता सुसज्ज प्रयोगशाळा आहे. सर्व प्रकारचे खेळ आहेत. पोरं खेळातही बक्षिसं मिळवतात. प्रत्येक मुलानं आपल्या वाढदिवसाला एक पुस्तक शाळेला भेट द्यावं, अशी एका विद्यार्थ्यांची कल्पना होती. तिला चांगला प्रतिसाद मिळाला. पोरांनी छान छान पुस्तकं भेट दिली. मग ग्रंथालयही मोठ्ठ झालं. गेल्या वर्षी तर दहावीचे ३ विद्यार्थी बोर्डात आले....

''वा ! वा ! वा !'' सदानंदाने भावनातिरेकाने, त्या गृहस्थांचे दोन्ही हात हातात घेऊन चक्क दाबले.

''अहो पण आपण कोण? आपला शाळेशी एवढा जिव्हाळा का?'' त्या गृहस्थांनी विचारले.

मी ... मी त्याच शाळेचा विद्यार्थी. शिकून मोठा होऊन , पुन्हा त्याच शाळेत 'शिक्षक' म्हणून येण्याचं

मी शाळेला वचन दिलं होतं. आज १० वर्षांनी त्या वचनपूर्तीसाठीच मी शाळेत चाललो आहे. मी एम्. ए., बी. एड् केलं आहे.

''अरे वा! आज तुमच्यासारख्या तरूणांची  समाजाला फारच गरज आहे. बरं, तुमचं नाव काय म्हणाला?''  त्या गृहस्थांनी विचारले.

''मी ... सदानंद , सदानंद चाफेकर.

''तूच काय तो सदानंद? हात्तिच्या..... अरे, आमाचा नरेंद्र अजून तुझा आठवण काढतो. तुझ्याबरोबरच होता तो. पण तो 'संस्कृत' च्या तुकडीत होता.  ते गृहस्थ 'अहो जाहो' वरून एकदम 'अरे तुरे' वर आले आणि सदानंदाकडे अतिशय प्रेमाने पाहू लागले. एस्. टी. नं जोरात हिसका घेतला. सदानंदाने खिडकीतून बाहेर पाहिले 'आनंदवाडी' ही पाटी झळकली. चंदनपूरच्या अलीकडचं  गाव.

या भागात शाळेनं 'शेतकी शाळा' सुरू केली. खेड्यातल्या शेतकऱ्यांच्या मुलांसाठी , शेती विषयीचे कोर्स, शेती सुधार केंद्र, कुक्कुटपालन, गांडूळखत प्रकल्प, असे अनेक उपक्रम येथे राबिवले जातात. शिवाय इथे 'तांत्रिक शिक्षण केंद्र' ही झालंय.'' त्या गृहस्थांनी माहिती पुरविली.

खिडकी बाहेरची नजर न हटवता सदानंदान विचारलं,

''साखर कारखान्याजवळ अंगणवाडी आणि महिला मंडळ झाल्याचंही मी पेपरात वाचलं होतं.''

''होय तर! पण बरं का सदा, बंद गटारं, कचरा हटाओ आणि दारूबंदी काही अजून झाली नाही बघ.''

अखेर चंदनपूर आलं. तसं त्याच्या छातीत धस्स झालं. 'गाव आपल्याला कसं वागवेल? जुनी माणसं मानतील पण नवी जुमानतील का?' अनेक प्रश्न त्याच्या मनात आले. पण पुन्हा त्याने विचार केला,'गाव आपलं आहे.

१० वर्षांनी आपण त्याला दुरावलो. म्हणून काय झालं? गाव आपल्याला नक्की सामावून घेईल आणि आपण स्वत: कधीच हार मानली नाही. जिथं जाऊ तिथल्या लोकांना आपलसं केलं. मधल्या कालखंडानंतरही आपण गावाला कवेत घेऊ. त्यावेळी पोरवयात नाही का सगळी शाळा आपल्या पाठीशी उभी राहिली? त्या पोरवयातही आपण शाळेतला तो दुर्लक्षित 'कोपरा' किती आत्मविश्वासानं उजळवला होता...'

'कोपरा' या शब्दानं तो थबकला. शाळेत पूर्वी घडलेला तो प्रसंग... त्यानंतरचे अनेक प्रसंग, अनेक घटना, घडामोडी... १० वर्षांपूर्वीच्या काळात तो येऊन पोहचला होता- काय घडलं त्यावेळी?

शाळेत तिळगूळ समारंभ चालू होता. या गोड कार्यक्रमाला एका विद्वान लेखकाला आमंत्रित केले होते. त्यांच्या भावपूर्ण भाषणाने शाळेचा परिसर मंत्रमुग्ध झाला होता. तेवढ्यात सूत्रसंचालन करणाऱ्या शिक्षिकेने ध्वनिक्षेपकावरून नाव पुकारले,


सदानंद चाफेकर हा विद्यार्थी आता 'आभारप्रदर्शन' करेल

सर्वत्र शांतता पसरली. कोण हा सदानंद?  असा विचार करत पुढे बसलेल्या विद्यार्थ्यांनी गर्रकन माना मागे वळवल्या व त्यांचे डोळे सदानंदाचा वेध घेऊ लागले. कारण यापूर्वी हे नाव कधीच घेतलं गेलं नव्हतं. सभारंभात मिरवण्याची मक्तेदारी, काही मोजक्या, अति-उत्साही मुलांची होती. सदानंद विद्यार्थ्यांमधून वाट काढत पुढे जाऊ लागला., तसा मागे बसलेल्या २०-२५ मुलांनी दोन्ही हात हवेत हलवत गलका केला. ते कोरसमध्ये ओरडू लागले.  कोपराऽ कोपराऽ कोपराऽ कोपराऽऽऽ चार आण्याची अक्कल वापराऽ

व्यासपीठावरचे मुख्याध्यापक चुळबुळ करू लागले. प्रमुख पाहुण्यांच्या कपाळावर प्रश्नचिन्ह उमटले. सूत्रसंचालन करणाऱ्या परांजपे  बाईंनी, सर्वांना शांत बसण्याचे व सभेचे संकेत पाळण्याचे आवाहन केले. धीमेपणानं पावले टाकत व चेहऱ्यावरचे संतुलन न बिघडवता, आत्मविश्वासानं सदानंद ध्यनिक्षेपकापुढे उभा राहिला,

''व्यासपीठावरचे मान्यवर, माननीय शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो...

सदानंदाच्या बुलंद आवाजाने आणि उमद्या व्यक्तिमत्वाने, 'कोपराऽ कोपराऽ' म्हणत हवेत  हलणारे हात आपोआप खाली आले आणि सर्वजण आत्मीयतेने त्याचे बोलणे ऐकू लागले. त्याच्या मुद्देसूद आणि लालित्यपूर्ण आभारप्रदर्शनाने सर्वजण



थक्क झाले. भाषणाच्या शेवटी मिश्किलपणे, मागे बसलेल्या दंगेखोर मुलांकडे बघत तो म्हणाला ,

''आजच्या गोड कार्यक्रमाला, कडसर चव न आणण्याचा प्रयत्न केल्याबद्दल सर्व विद्यार्थी मित्रांचे मन:पूर्वक आभार. धन्यवाद!''

व्यासपीठावरच्या मान्यवरांना लवून नमस्कार करून, सदानंद खाली आला आणि विद्यार्थ्यांमध्ये दिसेनासा झाला. त्याचे शेवटचे वाक्य दंगेखोर मुलांना झोंबले. पण त्यांनी त्यावर कडवट प्रतिक्रिया दिली नाही.

कार्यक्रम संपल्यावर मुले घोळक्याघोळक्याने गप्पा मारत उभी होती. सदानंद आपल्या वर्गमित्रांसह गप्पा मारत होता. ज्ञानेश्वर त्याला म्हणाला,

''तू तर कमालच केलीस. त्या '८ वी अ' चं नाक खाली केलंस!''

''अरे! पण मला एक सांग, ते 'कोपराऽ कोपराऽ'असं का ओरडत होते?''

''अरे ती '८ वी अ'ची मुलं स्वत:ला फार शहाणी समजतात. ती 'संस्कृत'ची तुकडी आहे ना! म्हणून फार भाव खातात. 'ब','क' आणि 'ड' तुकडयांना कमी लेखतात. त्यात आपला वर्ग हा असा कोपऱ्यात. वर्गात अंधार, पावसाळ्यात गळतं, बाजूला आंब्याची झाडं फार वाढलीत; त्याचा अंधार फार येतो, बाकंही बरीच मोडकी आहेत- करकर वाजतात. आपल्या वर्गात, गावातील शेतकऱ्यांची, दुर्गम-डोंगराळ भागातील आणि व्यापाऱ्यांची मुलं जास्त. त्यामुळे शिक्षकही या वर्गाचा राग-राग करतात,चांगल शिकवत नाहीत.'' ज्ञानेश्वर रागाने लाल झाला.

''अरे, पण हे योग्य नाही. आपण हे बदलायला हवं. आपण आपल्यासाठी, वेगळ्या वर्गाची मागणी करू. शिक्षकांना विश्वासात घेऊन त्यांना आपल्या समस्या सांगू'' सदानंद म्हणाला. ''त्याचा काही उपयोग होणार नाही. आपण कितीही ओरडा केला तरी आपल्याला दुय्यम वागणूकच मिळणार. अरे, तुला या शाळेत येऊन २-३ महिनेच झालेत. मी पहिलीपासून इथेच शिकतोय. वर्षानुवर्षांचा माझा अनुभव आहे, की संस्कृतच्या हुशार तुकडीलाच या शाळेत सन्मानानं वागवलं जातं. बाकीची मुलं म्हणजे 'ढ' गोळे! याच कारणाने अभ्यासेतर उपक्रमातही इतर तुकड्या कुठेच चमकत नाहीत. ते जाऊ दे रे! पण तू आज त्यांना चांगला धडा शिकवला. आज तू 'कोपरा' चा मान राखलास!'' ज्ञानेश्वरने सदानंदाच्या पाठीवर थाप मारली. तेवढ्यात घंटानाद झाला. मुले पांगली. सदानंदही निघाला.

आपण ज्या 'कोपरा' वर्गात शिकत आहोत, त्या वर्गाचा आणि त्यातील प्रत्येक विद्यार्थ्याचा कायापालट घडवायचा, असा मनाशी निश्चय करून सदानंद झपाझप रस्ता कापू लागला.

घरी पोहोचल्याबरोबर त्याने सुवाच्य अक्षरात, एक विनंती अर्ज लिहिला. त्यामध्ये मुख्याध्यापकांना वर्गातील सर्व दुरूस्ती आणि खिडक्यांजवळील झाडांच्या फांद्या कापण्याविषयी विनंती केली होती. पावसाळ्यात वर्गात गळत असल्याने, कौलांची दुरूस्ती करण्याची विनंती वजा सूचनाही, त्यांना नमूद केली. दुसऱ्या दिवशी सर्व विद्यार्थ्यांच्या त्यावर सह्या घ्यायच्या, असं ठरवून सदानंद जेवायला बसला. त्याचा अस्वस्थपणा त्याच्या आईच्या नजरेतून सुटला नव्हता. न राहवून जेव्हा आईने त्याला विचारले, तेव्हा सर्व हकीकत सांगितली. त्यावर आई म्हणाली,

''हो! पण त्यासाठी केवळ वर्गाची डागडुजी पुरेशी नाही, तुमच्या वर्गातल्या, मुलांच्या मनाचीही डागडुजी होणं आवश्यक आहे. त्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण व्हायला हवा. 'संस्कृत' च्या तुकडीतील मुलं तुम्हाला चिडवता, तसे तुम्ही त्यांना चिडवायचं नाही.

वैरभाव, प्रतिस्पर्धा करायची नाही. तुम्ही तुमच्या सद्‌गुणांनी, विद्यार्थ्यांना आणि सर्व शाळेला दाखवून द्या, हम भी कुछ कम नही.''

सदानंदाने मान डोलावली. नव्या सोनेरी उषेची वाट बघत , तो झोपी गेला.

दुसऱ्या दिवशी शाळेत जाताना, रस्त्यात एका मुलाने सायकल आडवी घालून सदानंदाला अडवले,

''हाय! मी नरेंद्र चव्हाण . आठवी 'अ' मध्ये आहे कालचं तुझं आभारप्रदर्शनाचं भाषण छान झालं. त्या 'ढ' मुलांच्या तुकडीत तुझ्यासारखा धीट मुलगा .....''

''एक मिनिट'' त्याला थांबवत सदानंद म्हणाला,'एखाद्या वर्गाला असं कमी लेखणं चांगल नाही. त्यापेक्षा आमच्यात काय कमी आहे, ते जाणून, तुम्ही आम्हाला, तुमच्या बरोबरीचे होण्यासाठी मदत करायला हवी.''

''अरे ,काय सांगायचं! तुमच्या तुकडीत बहुसंख्य शेतकऱ्याची, व्यापाऱ्यांची आणि आदिवासी मुलं आहेत. ते टाईमपास करायला शाळेत येतात. पेरण्या सुरू झाल्या, की वर्गातली संख्या निम्म्यानं कमी होते. सुगीच्या हंगामात तेच . या मुलांना शेतीत जास्त इंटरेस्ट आहे, शिकण्यात नाही. व्यापाऱ्यांच्या मुलांना तर दहावी पास झाल्यावर, गल्ल्यावर नोटा मोजायच्या असतात. ते सुद्धा धंदापाणी करून फावल्या वेळात शाळेत पायधूळ झाडतात. आपल्या गावाजवळच्या दुर्गम भागातल्या वाड्या-वस्त्यामंधील दरिद्री मुलंसुद्धा खूपदा गैरहजर असतात. इतक्या सवलती मिळूनही ह्या मुलांमध्ये, शिक्षणाची आच नाही बघ.'' नरेंद्रने आपली मतं नोंदवली. सदानंदाला आपल्याच 'ढ' वर्गाची नव्यानं ओळख झाली. गप्पा मारत डबलसीट ते शाळेत पोहोचले आणि मुलांच्या गर्दीत मिसळून गेले. हो! हे एक मात्र बरं झालं की भिन्न तुकडीतल्या दोन मुलांमध्ये, मतांची, माहितीची देवाणघेवाण, चर्चा तरी झाली. असं पूर्वी फारसं घडलं नव्हतं.

सदानंदाने आपल्या नम्र आणि मधुर वाणीने त्यांच्या 'कोपरा' वर्गात अनेक बदल घडवून आणले.

आश्चर्य म्हणजे, मुख्याध्यापकांसह अनेक शिक्षकांनीही त्यांचे म्हणणे ऐकून घेतले आणि त्याच्या योगे सूचनांची अंमलबजावणीही केली. 'कोपरा' वर्गाच्या बाह्य परिस्थितीत सुधारणा झाल्यावर, मुलांच्या वागणुकीतही बदल व्हायला लागले. मुलांना वर्गात यावेसे वाटू लागले. अभ्यासाविषयी ते चर्चा करू लागले. एकमेकांच्या समस्या सोडवू लागले. बाहेरच्या वस्त्यांमधल्या मजुरांच्या मुलांना, शेतकऱ्यांच्या मुलांना नियमित शाळेत येता यावे, यासाठी त्याने त्यांच्या पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

विचार करत सदानंद, एस. टी. स्टँडवरून चालतच शाळेच्या गेटजवळ आला होता. जवळच त्याला एक पाटी दिसली. त्यावर एकाखाली एक अशा अनेक संस्थांची नावं लिहिलेली होती. 'शेती शाळा', 'बालवाडी','तंत्रज्ञान शिक्षण केंद्र', 'वसतिगृह', 'फिरता दवाखाना' असे अनेक उल्लेख त्यात होते. ते वाचून सदानंदाला गलबलून आले. आपल्या गावाचा, शाळेचा आणि पर्यायाने इथल्या लोकांचा हा विकास त्याला सुखावून गेला.

सदानंद आत गेला तेव्हा तर त्याचा, त्याच्या डोळ्यावर विश्वासच बसेना. शाळा अगदी हिरवीगार झाली होती. थोडं पुढे गेल्यावर त्याला एक छोटी पण नवी इमारत दिसली. ते म्हणजे सुसज्ज ग्रंथालय होते. कोपऱ्यात 'संगणक प्रशिक्षण विभाग'ही होता! लांबवर पसरलेल्या शाळेकडे सदानंदाने कौतुकाने पाहिले.

क्षणभरात शाळा पोरांच्या कोलाहलाने गजबजली. सदानंद त्या पोरांकडे उत्सुकतेने, कौतुकाने पाहात होता स्वच्छ गणवेशातील मुले व मुली मोकळेपणाने वावरत होती. एका मुलाला सदानंदाने विचारले ,

''काय रे, कार्यालय कुठे आहे? सर भेटतील का?''

''तो पाहा तो 'कोपरा', तिथे सर भेटतील ''-उत्तर.

'कोपरा' या शब्दाने सदानंद एक दम दचकला. त्या मुलांकडे संशयाने पाहू लागला. एक चुणचुणीत मुलगी म्हणाली,''अहो, तो कोपऱ्यातला वर्ग आहे ना, त्यालाच आम्ही 'कोपरा' म्हणतो- 'सदानंदाचा कोपरा'.' नेहमी आनंद देणारा कोपरा म्हणून हा 'सदानंदाचा कोपरा' . पूर्वी कोणी सदानंद नावाचा

(पान १६ वर पुढे चालू)

# मी कोण होणार?
## निर्णय कसा घ्यावा?

**डॉ. श्रीराम गीत**

**रा**जेश व अमित ही दोन मुले मला अनेकदा आठवतात. दोघेही अभ्यासात हुशार. शाळेत आलटून पालटून त्यांचा पहिला किंवा दुसरा नंबर असे. काही वर्षांपूर्वी त्यांनी दहावीची परीक्षा, दिली होती. तब्बल दोन महिने विविध टेक, पोहणे, मौज-मजा यात गेल्यावर एके दिवशी निकाल लागला. मार्क उत्तम पडणारच होते. निकालाचे पेढे दोघांनीही एकदमच मला दिले. स्वाभाविकच माझा पुढचा प्रश्न होता, 'पुढे काय करणार आहात?'

अमितने उत्तर दिले, ' मी आर्टस्‌ला जाणार आहे, पदवी तर मिळेलच पण नंतर एम.ए. करत असतानाच, सिव्हिल सर्व्हिसेस किंवा डिफेन्स सर्व्हिसेससाठी अभ्यास करणार आहे. जे प्रथम मिळेल ते मला चालेल. दोन्ही उत्तमच वाटतात. काहीतरी मी नक्की मिळवीन, असा मला आत्मविश्वास वाटतो.' थोडेसे आश्चर्यानेच हे सारे मी एकले, अन् राजेशकडे प्रश्नार्थक नजरेने बघितले. राजेश म्हणाला,'तसे माझे अजून काहीच ठरत नाही. पण मी सायन्सला जाणार गणित पण घेईन, बायोलॉजी पण घेईन. जमेल तर डॉक्टर होईन. नाहीतर इंजिनियरिंगला मिळेलच . आर्टस्‌च्या शंभर मुलीत जाऊन बसायला, मला अजिबात आवडणार नाही, एवढे मात्र खरे!'

मला या साऱ्या संवादाला विसरून जायला काहीच हरकत नव्हती. पण तो मनावर कोरला जाण्याजोगे, पुढे बरेच काही घडायचे होते. अमित एम.ए. करीत असतानाच इंडियन मिलीटरी ॲकॅडमीत निवडला गेला. तेथील शिक्षणक्रम पुरा करतानाच एक्स्टर्नल परीक्षा देऊन, त्याचे एम.ए. पण झाले. आज तो आसाममध्ये कॅप्टन म्हणून. जबाबदारी आनंदाने संभाळत आहे. रुबाबदार आयुष्याची दमदार सुरूवात त्याने केली आहे. राजेशच्या हातून मात्र बारावीचे गणितही कमी पडले व बायोलॉजीतही तो मागे पडला. इंजिनियरींगला कॉम्प्युटर, मेकॅनिकल या शाखात, तो फारच मागे पडला आणि मेडिकलच्या जवळपासही तो पोचला नाही.

बी. एस्सी. केमिस्ट्री घेऊन तो पास झाला, पण शिक्षणातील सारा रस संपल्याने जेमतेम पहिला वर्ग त्याला मिळाला. अर्थात एम्. एस्सी.ला प्रवेश मिळालाच नाही. सध्या राजेश कॉम्प्युटर शिकण्याच्या प्रयत्नात आहे. भरमसाठ फिया मोजत, एक एक कोर्स कष्टाने तो शिकत आहे. त्याचे नेमके भविष्य अजून सापडत नाही.

**पुढे काय करायचे? याचा निर्णय योग्य वेळी घ्या :** ही सारी बोधकथा नाही तर घडलेली व वरचेवर अशीच घडत राहणारी कहाणी आहे. राजेश का अमित, याचा निर्णय जर तुम्हाला घ्यायचा असेल तर तुम्ही ते योग्य वेळी ठरवायला हवे . ही योग्य वेळ कोणती? खरे म्हणजे दहावी परीक्षेच्या आधी सहा महिने या विचाराला सुरूवात करावी. त्यासाठी दिवाळीची सुट्टी उत्तम. अनेक कोर्सेसची प्राथमिक माहिती त्यावेळी करून घेणे सहज शक्य असते. त्यावेळी एवढेच पुरे.

डोक्यात शिरलेली माहिती, मनात रूजू देत, पुरेशी शिजू दे. त्यासाठी सहा महिने हवेत. मग होते दहावीची परीक्षा. या लांबलचक सुट्टीत जे करावेसे वाटते त्या क्षेत्रातील माणसे काय करतात? त्याची माहिती गोळा करायला लागावे. हे अगदी सोपे असते. काका, मामा, वडिलांचे मित्र, फॅमिली डॉक्टर, शेजारी, त्यांच्यापैकी प्रत्येकजण काहीतरी करीतच असतो. कोणी चार्टर्ड अकौंटंट तर कोणी मॅनेजर म्हणून काम करीत असतो.

तुम्ही कसे शिकलात? तुमचे कॉलेज चांगले होते का? अन्य कोणते कॉलेज चांगले होते? सध्या वा क्षेत्रात प्रवेश घेताना मार्क किती लागतात? प्रवेश परीक्षेची तयारी करावी लागते का? तुम्हाला यामध्ये काय काय अडचणी जाणवल्या, आज काय अडचणी आहेत? एवढ्या साध्याशा प्रश्नांची उत्तरे मिळविणे सहज शक्य असते. सगळ्याच व्यवसायाचे लोक जरी भेटले नाहीत, तरी महत्त्वाची क्षेत्रे तरी यातून माहिती होऊ शकतात. चौकस मुलाला/मुलीला, अधिक माहिती मिळविण्यासाठी, अजून चार ओळखीच्या मित्रांची नावे सहज सुचविली जातात. या साऱ्याचा फायदा उठवणे , आपल्याच हातात असते.

सगळ्याच नवनवीन क्षेत्रांची माहिती या पध्दतीने मिळणार नाही, हे नक्कीच. पण हवेत तरंगणारे पाय या माहितीमुळे जमिनीवर टेकू खूपच लागतात. हा फायदा नक्कीच होतो. सत्तर टक्के जेमतेम मिळवणारा मुलगा, मग डॉक्टर - इंजिनियरींगची भाषा विसरायचा विचार करतो. जेथे प्रवेश नक्की मिळेल अन् अभ्यास वाढवून पुढे जाता येईल, असे क्षेत्र मनासमोर आणू शकतो. मग त्यात कदाचित हॉटेल मॅनेजमेंट, ट्रॅव्हल ॲण्ड टूरिझम, इंटिरियर डेकोरेशन, असेही क्षेत्र चांगले असू शकते.

**मुलांचा कला दाखवणारी चाचणी :** ॲप्टीट्यूड टेस्ट

दहावीची परीक्षा झाल्यावर, ही चाचणी अवश्य करून घ्यावी. इंग्रजी - मराठी माध्यमातून लेखी किंवा कॉम्प्युटरच्या मदतीने ही चाचणी घेतली जाते. ज्ञान प्रबोधिनीमध्ये, प्रज्ञा मानस संशोधिकेद्वारा हे काम, गेली अनेक वर्षे मोठ्या प्रमाणावर चालू

आहे. या चाचणीला कसलीही तयारी लागत नाही. अभ्यास नसतो. कोणत्याही  दिवशी देता येते. जेमतेम तीन-साडेतीन तास चालणाऱ्या या चाचणीतून मुलांच्या नवीन गोष्टी आत्मसात करण्याच्या क्षमता, चर्चात्मक व विश्लेषणात्मक बुध्दी, शब्दसंपत्तीचा वापर, आकडेमोडीतील गती, आमडच्यांची स्मरणशक्ती, माणसांना समजावून घेणे व समाजात वावरणे, अशासारख्या  अनेक क्षमतांवर प्रकाश पडतो.

काही व्यवसायात त्यापैकी काही क्षमतांची गरज प्रकर्षाने असते तर काहींमध्ये यातील काही क्षमता कमी असल्या तरी चालू शकते. उदाहरणार्थ इंजिनियरला डिझाईन काढणे, गणित करणे, आकडे लक्षात ठेवणे हे महत्त्वाचे ठरते तर डॉक्टरला समाजात मिसळणे, लोकांना जाणून घेणे, त्यांच्याबद्दल सहानुभूति वाटणे, हे आवश्यक ठरते. कायदा, व्यवस्थापन, समाजशास्त्रे यासाठी, शब्दसंपत्ती व माहितीचा, अनुभवाचा, ज्ञानाचा वापर, महत्त्वाचा ठरतो. हे सारे एका मोठ्या लेखाचेच विषय आहेत. येथे त्यांची फक्त तोंड ओळखच दिली आहे.

काहीही करावयाचे जरी मनात नक्की केले असले, तरी ही चाचणी त्यासाठी मार्गदर्शक ठरते. आपल्या मार्गातील अडथळे कोणते? क्षमता कोठे कमी पडू शकतील? त्या सुधारण्यासाठीचे प्रयत्न, याबद्दल या चाचणीतून खूप मार्गदर्शन मिळू शकते. मुलाचा कल नेमक्या दिशेला असेल तर इच्छापूर्ति  होतेच होते. दिशाच नेमकी ठरली नसेल, तर ती दिशाही  या चाचणीतून उलगडत जाते.

**महत्त्वाचे अन्य निकष कोणते?** आई- वडील काय करतात? कुटुंबाचा काही व्यवसाय आहे काय? शिक्षणानंतर मूळ गावी राहण्याची इच्छा आहे का? कुठेही जायची तयारी आहे का? आर्थिक, बौध्दिक व शारीरिक क्षमता कशा आहेत? कितव्या वर्षी अर्थार्जन सुरू व्हावे व ते किती असावे, याची मुलांची व आईवडिलांची अपेक्षा काय?

या साऱ्या निकषांचा विचार आईवडील व मुलगा/मुलगी यांनी एकत्रितपणे करायचा असतो. पण ते न करता मुलाला/मुलीला जबरदस्तीने स्वत:च्या व्यवसायात घातले, तर फक्त नाराजीच निर्माण होऊन, ती आयुष्याला व्यापून टाकते.

पैसे आहेत म्हणून देणगी देऊन घेतलेल्या प्रवेशानंतर सतत नापास झाल्याने, कोर्स सोडून निघाल्याची उदाहरणे थोडीथोडकी नसतात. जो व्यवसाय/नोकरी पुढे करावी लागणार आहे, त्याची आवड आहे वा नाही, हा एक फार महत्त्वाचा निकष असतो.बैठे काम अजिबात आवड नसेल तर अकौंटन्सी, चार्टड अकौंटंट, कॉम्प्युटर प्रोग्रॅमर, अशा रस्त्याचा आग्रह धरायचा का? फिरतीची आवड नसेल तर मार्केटिंगमध्ये पडणे धोक्याचे असते. आजारी माणसे पाहून कपाळावर आठी पडत असेल तर मेडिकल आपल्यासाठी नव्हे, असे साधेसोपे पण महत्त्वाचे निकष! स्वत:ला प्रश्न विचारून त्यांचे उत्तर मिळत जातात.

**ध्येय निश्चित करा, तेथे पोहोचण्याचे अनेक मार्ग असतातच:**

डॉक्टर व आय.ए. एस. या दोन क्षेत्रांशिवाय बाकी प्रत्येक क्षेत्रात, तेथवर पोहचण्याचे विविध मार्ग उपलब्ध असतात. त्यामुळे एका ठिकाणी अडेल, प्रवेश मिळाला नाही तर तेथे पोहोचण्याचा अन्य मार्ग कोणता? याची माहिती करून घ्यावी. या दिशेने प्रयत्न करण्यासाठी नेमके मार्गदर्शन लागते . व्यक्ती- व्यक्तींचे प्रश्न व त्यांची बाद्धिक कुवत,  यात फरक असतोच. पण नेमके मार्गदर्शन मिळाले तर ध्येयापर्यंत पोहोचण्याचे विविध मार्ग सहज उपलब्ध होत जातात. उदाहरणच द्यायचे झाले तर इंजियनिरींगचे देता येईल. दहावीनंतर डिप्लोमा इंजिनियर होता येते. प्रथम वर्ग मिळवून डिग्रीला दुसऱ्या वर्षाला प्रवेश मिळू शकतो. बारावीनंतर डिग्रीला प्रवेश मिळाला तर उत्तमच. अन्यथा फिजिक्स घेऊन पदवी मिळाल्यावर GATE ची परीक्षा देऊन बी.टेक.ला. जाता येते. एम. एस्सी. उत्तम पास झाल्यावर GATE देऊन एम. टेक. ही करता येऊ शकते. यातील काहीच शक्य झाले नाही तर AMIE चा इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्सची परीक्षा देऊन B. E. समकक्ष पदवी मिळवता येते. थोडक्यात म्हणजे एक गाडी चुकली तर हताश न होता, पुढच्या गाडीसाठी प्रयत्न लगेच सुरू करणे आवश्यक असते.

**सातत्य, चिकाटी, अभ्यासूवृत्ती, चौकसपणा हवा :** रुळलेल्या वाटेवरून जायचे असेल किंवा पारंपरिक अभ्यासक्रम घ्यायचे असतील तरीही, या चार गुणांची फार गरज असते. उत्तम मार्क(म्हणजे ९९ टक्के) मिळवलेली काही मुले इंजिनियरींग किंवा मेडीकलला पहिल्या वर्षी नापास झालेली आढळतात. अर्थ काय? या दोन्हीसाठी प्रवेश घेणारी सर्वच मुले, किमान नव्वद टक्के मार्क मिळवणारी असतात. पण प्रथम वर्षाचा इंजिनियरींग वा मेडिकलचा निकाल मात्र जेमतेम साठ-पासष्ट टक्केच लागतो. याचा अर्थ, या चार गुणांची जोपासना कमी पडते हाच आहे.

मी काय शिकू? मी काय करू ? या साऱ्याची उत्तरे आपणच शोधायची असतात. त्यासाठीचे अगदी सोपे साधे निकष आपण येथे पाहिले आहेत. मनाशी विचार करा, मार्ग समोर दिसू लागेल.

●●

**डॉ. श्रीराम गीत**
'इंदुमती', २१७९, सदाशिव पेठ ,
टिळक रोड, पुणे ३०.



नको विसावा, नको भीतिचा लवलेशहि हृदयात, विजयश्रीला जिंकतील हे बलाढ्य अमुचे हात.

# तिची खंत

निरंजन घाटे



**मु**लं शाळेतून घरी यायची होती. राधा मुलांसाठी खायची तयारी करीत होती. नेमका त्याच वेळी फोन आला. फोन वाजताच, स्वयंपाक घरातल्या राधाच्या कपाळावर आठ्या चढल्या होत्या. तिनं गॅसवरची कढई खाली उतरवून ठेवली. गॅसवर पाणी ठेवलं आणि फोन घेतला. रमेशचे साहेब बोलत होते. कारखान्यात अपघात झाला होता. त्यात सहाजण जखमी झाले होते. त्यांना रुग्णालयात नेण्यात आले होते. रमेशचाही त्यात समावेश होता. रासायनिक कारखान्यात अपघात झाला तर काय होतं, याची राधेला कल्पना होती. त्यामुळे 'काळजी करण्याचं कारण नाही ', या रमेशच्या साहेबांच्या बोलण्यावर, तिचा अजिबात विश्वास बसलेला नव्हता. फोन ठेवताच गॅस बंद करून ती शेजारी गेली. रमाला तिनं, मुलांना खायला द्यायला सांगितले. रिक्षा करून ती रुग्णालयात पोहोचली. रमेश अतिदक्षता विभागात होता. दुर्दैवानं त्याच रात्री त्याचे निधन झाले. मुलांनी अंत्यदर्शन घेऊ नये, असं रमेशच्या जवळच्या मित्रानं सुचवलं. रमेश जगला नाही ते बरं झालं, असंच सर्वांच म्हणणं, नंतर काही दिवसांनी राधाच्या कानावर आलं.

रमेश गेल्यावर रमेशच्या मित्रांनी, तिला सर्व मदत केलीच. शिवाय राधाचा भाऊही भावाहून आला होता. विम्याचे पैसे मिळविणे, ते बँकेत ठेवणे, कंपनीने दिलेली नुकसान भरपाई मिळविणे, ती योग्य ठिकाणी गुंतविणे, वगैरे पार पडलं. राधा मुलांकडे बघून बरीच सावरली. एक दिवस तिच्या भावानं मुलं नसताना, घरी येऊन आर्थिक व्यवस्थेची कल्पना दिली. ''राधा'', तो म्हणाला,'' आई बाबा गावात एकटेच राहतात. ते गाव सोडून माझ्याकडं यायला तयार नाहीत. बाबा अर्धवेळ नोकरी करतात, ते केवळ वेळ घालवायला. मला वाटतं त्यांच्याकडं राहावंस. त्यांना सोबतही होईल आणि...!'' तो बोलता बोलता थांबला.

'' आणि काय रे दादा?'' राधानं विचारलं.

'' या जागेचे हप्ते फिटायचेत. येणाऱ्या व्याजात ते कसे फेडणार? त्यापेक्षा ही जागा तू वीक. तसंच कंपनीच्या मॅनेजरला मी भेटलोय, ते तुला नोकरी द्यायला तयार आहेत. बघ! तुझाही वेळ बरा जाईल. आई तुझी मुलं संभाळेल. तिचाही वेळ बरा जाईल. मलाही तुझी आणि त्यांची काळजी करायंच कारण नाही. तुला हे मान्य नसेल तर त्यांची जागा विकतो. त्यातून या जागेचं कर्ज फेडता येईल. मी कॅनडाला चाललोय हे तुला ठाऊक असेलच. तेव्हा तुमचं मार्गी लावून गेलो तर चिंता जरा कमी होईल. विचार कर.''

पुढच्या एक तारखेपासून राधा कामावर रुजू झाली. रमेशची पत्नी असल्यांमुळं तिला सर्वांची सहानुभूती मिळत होती. तीही कामात हुशार होती. थोड्याच

दिवसात ती तिथं रुळली. मुलांना संभाळायला आई होती. तिचे वडील नोकरी करीत होते. काही दिवसांनी ते वारले. तरी आईला ती आणि तिला आई, अशी सोबत असल्यामुळे त्यांचे चांगले चालले होतं. तिचा दादा कॅनडातून अमेरिकेत गेला. त्याची नोकरी उत्तम होती. दर दोन वर्षांनी तो भारतात येत होता. राधाच्या मुलाला विज्ञानाची आवड होती. त्याला शास्त्रज्ञमामा आवड होता. मामा आला की त्याला तो अनेक प्रश्न विचारुन भंडावून सोडत असे. इ.स. दोन हजार, विसाव्या शतकातलं, शेवटचं वर्ष संपत असताना, मामा अमेरिकेतून दिवाळीसाठी आला होता. राधाच्या मुलानं शाळेच्या ग्रंथालयात नुकतंच 'एकविसावं शतक' नावाचं एक पुस्तक वाचलं होतं. एकविसाव्या शतकात वैज्ञानिक प्रगतीची दिशा कशी असेल? याची माहिती देणारं हे पुस्तक होतं. त्यातल्या तपशिलाची राधाचा मुलगा राम, माहिती करून घेत होता. रामनं मामाला विचारलं,

''मामा तू जीवतंत्रज्ञाना-विषयीचं संशोधंन करतोयस ना, मग तुझा 'जिनाम प्रकल्पा'शी संबंध आहे का?'' भाच्याच्या या प्रश्नाचा मामाला अचंबा वाटला. नुकतीच दहावीची परीक्षा पास झालेल्या आपल्या भाच्याला 'जिनोम प्रकल्पा'ची माहिति आहे, हे बघून त्याला आनंदही झाला. तो म्हणाला,

''रामा, तुला रे 'जिनोम प्रकल्पा'ची माहिति कुठून मिळाली?''

'' 'एकविसावं शतक!' पुस्तकातून! ग्रंथालयात आहे ते पुस्तक. मला आणून देशील?''

''आणीन की;पण आधी तू 'जिनोम प्रकल्पा'ची तुला काय माहिति आहे, ते मला सांग!''

'' तो एक आंतरराष्ट्रीय प्रकल्प आहे. माणसाच्या गुणसूत्रांवर जी जनुकं असतात, ती कोणकोणते गुणधर्म पुढच्या पिढीत नेण्यासाठी जबाबदार असतात? त्यांची संरचना कशी असते? याचा क्रमवार नकाशा तयार करण्यासाठी , या प्रकल्पात खूप शास्त्रज्ञ काम करतात. तो पूर्ण व्हायला एकविसाव्या शतकाची, पहिली पाच-दहा वर्षे जावी लागतील. हा प्रकल्प यशस्वी झाला तर बऱ्याच आनुवंशिक रोगांवर आणि दोषांवर मात करता येईल.''

भाच्यांचं हे ज्ञान पाहून मामा खूपच प्रभावित झाला. राधा हा संवाद ऐकत होती. पण तिला आपला मुलगा आपल्या भावाला काय सांगतोय? हे नीट कळलं नव्हतं. तिला तिच्या कचेरीतल्या घटनांचीच जास्त काळजी होती. त्यांच्या कंपनीनं कुठल्या तरी अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनीशी, काही करार करायंच ठरवलं होतं. त्याच्या उलट-सुलट चर्चा तिच्या कानावर येत होत्या . त्याबद्दल तिला भावाशी बोलायचं होतं. त्यामुळं ती खरंतर या खोलीत आली होती आणि मामा-भाच्यांची ही चर्चा तिच्या कानावर पडली होती, एवढंच.

राधाला जरी कल्पना नसली तरी या संशोधनाचा तिच्या आयुष्यावर आणखी पाच-सहा वर्षांनी फार मोठा परिणाम होणार होता. त्यांची रासायनिक उत्पादनाची कंपनी हळूहळू एका बहुराष्ट्रीय कंपनीनं गिळंकृत केली. राधासारख्या कर्मचाऱ्यांना कंपनीचं नाव बदललं आणि त्यांचा पगार व सवलती वाढल्या, एवढ्यापुरताच हा बदल वाटला. शनिवार-रविवार जोडसुट्टी मिळू लागली, तसंच बऱ्याच जणांना यंत्राच्या आणि उत्पादनांच्या माहितीसाठी परदेशी जाण्याची संधी उपलब्ध झाली, एवढंच दिसत होतं. मध्यंतरी संगणकी भाषा शिकून घेण्यासाठी, राधालाही कंपनीनं स्वखर्चाने, सहा महिन्याच्या एका प्रशिक्षणासाठी प्रवृत्त केलं होतं. मुलांबरोबर तिनंही हे प्रशिक्षण

गावातच पूर्ण केलं होतं.

संकट सांगून येत नाहीत, माणूस बेसावध असताना ती येतात; राधावर आलेलं संकट असंच अनपेक्षित होतं. ज्या अमेरिकन कंपनीमध्ये ती नोकरीस होती; म्हणजे त्यांची मूळ कंपनी ज्या अमेरिकन कंपनीत विलीन झाली होती, त्या अमेरिकन कंपनीनं हळूहळू अमेरिकन नियमांनुसार कंपनी चालवायला सुरुवात केली होती. भक्कम काम, यांत्रिकीकरण, कामगारांना सवलती, सर्व काही अमेरिकन पध्दतीनं; कंपनी नावालाच भारतीय भूमीवर होती. त्यातच दरवर्षी वैद्यकीय तपासणी, १५ दिवस पूर्ण सुट्टी व कुठंतरी प्रवास, अशा गोष्टी होत्या.

इ. स. २००५ मधे या वैद्यकीय तपासणीत थोडा बदल झाला होता. प्रत्येकाच्या रक्ताच्या तपासणीबरोबर त्या व्यक्तीच्या गुणसूत्रांची, रोगांच्या शक्यतेसाठी–विशेषत: आनुवंशिक रोग आणि कुठल्या व्यक्तीला एखाद्या रोगाची बाधा होण्याची शक्यता आहे, याची ही तपासणी सुरु झाली.

एक दिवस पगाराबरोबर राधेच्या हातात एक लखोटा पडला. तिनं घरी येऊन तो उघडला. त्या लखोट्यात बऱ्याच मोठ्या रकमेचा चेक होता आणि बरोबर एक पत्र. राधेच्या गुणसूत्रांच्या तपासणीत, कारखान्याच्या उत्पादनाच्या निर्मितीबद्दल जी रसायनं वापरली जातात त्यामुळे, कर्करोगाची राधेस बाधा होण्याची शक्यता आहे. असं आढळून आलं होतं. यामुळे राधाला कंपनीन निवृत्त करायचं ठरवलं होतं. नुकसान भरपाई म्हणून तिला एक वर्षाचा पगार देण्यात आला होता. कंपनीशी राधेनं नव्यानं केलेल्या म्हणजे ती अमेरिकन मालकाची बनताना केलेल्या करारात, असं स्पष्ट नमूद केलं असल्याचं कलम त्या पत्रात होतं.

दुसऱ्या निवशी राधा कंपनीत गेली. व्यवस्थापकांना भेटली. वयाच्या चौविसाव्या वर्षी वैधव्य कोसळलेल्या राधानं या नोकरीच्या जोरावर, मुलांची शिक्षण पूर्ण करीत आणली होती. आता मुलगा पदवी परीक्षा देणार होता. त्याला उच्च शिक्षण घ्यायचं होतं. मुलगी बारावीत होती. ''मला कर्करोग झाला तरी चालेल आणखी पाच वर्षे नोकरी करू द्या.'' राधा व्यवस्थापकांना विनवून सांगत होती. ''नाहीतरी खूप जगून करायचं काय?'' ती म्हणाली.

तिचं म्हणणं व्यस्थापकांना कळत होतं, पण ते नियमानं बांधले होते. त्यांनी राधेला परत पाठवलं. जाताना तिनं दुसरा एखादा व्यवसाय करावा, असं त्यांनी सुचवलं. उभं आयुष्य या कंपनीत घालवलेल्या राधेला, दुसरा कोणताच व्यवसाय ठाऊक नव्हता. ती उदास होऊन घरी परतली. त्या शनिवारी तिच्या भावाचा अमेरिकेतून फोन आला, तेव्हा तिनं भावाला सर्व सांगितलं. त्यालाही हे नियमं ठाऊक होते. तो भारतात येईपर्यंत, त्यानं तिला दम धरायला सांगितलं.


आज राधा शिवणकामाला लागणाऱ्या वस्तू विकायचं दुकान चालवते. सुदैवानं तिचा मुलगा शिकलाय. दुकानात मदत करून मुलीनं शिक्षण पूर्ण करत आणलंय. राधाला कर्करोगानं ग्रासलेलं नाही. त्या रसायनाच्या सहवासात तिला कर्करोग होण्याची फक्त ५% शक्यता असताना, पुढं चुकून तिला कर्करोग झाला तर नुकसान भरपाई द्यावी लागेल, म्हणून तिला कंपनीतून काढणाऱ्या नियमांची आठवण झाली की राधा खूप उदास होते; मुलाला म्हणते, 'तुझ्या विज्ञानानं जगाच कल्याण केलं असेल पण माझ्यासारख्या अनेकांचं नुकसानंच केलं बघ!' यावर मात्र मुलगा गप्प बसतो.

**श्री. निरंजन घाटे**
३०७ चित्रशाळा, ५६२
सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

# कविता पानोपानी


## काळ्या काळ्या ढगा

काळ्या काळ्या ढगा –सुखी ठेव जगा
कोरड्या शिवारा – देऊ नको दगा।।




काळ्या काळ्या ढगा – सुखी ठेव जगा
नदी, नाले भरू दे – देऊ नको दगा।।

काळ्या काळ्या ढगा – सुखी ठेव जगा
तहानलेल्या पाखरांना – देऊ नको दगा।।




काळ्या काळ्या ढगा – सुखी ठेव जगा
रान, माळ पिकू दे – देऊ नको दगा।।

काळ्या काळ्या ढगा – सुखी ठेव जगा
झाडे, वेली, फुलांना – देऊ नको दगा।।



काळ्या काळ्या ढगा – सुखी ठेव जगा
खूप झाडे लावू आम्ही – देऊ नको दगा ।।

**रमेश डी. चव्हाण**
'साई–निकेतन' गुजरगल्ली, नवापूर, जि. नंदुरबार



## तुझ्या मनात दया असू दे!

रस्त्यावरून चालणाऱ्या
म्हाताऱ्या माणसांविषयी
त्यांना आधाराचा हात देण्यासाठी
तुझ्या मनात दया असू दे!

अडखळत ठेचकळत
काठी टेकवत चालणाऱ्या
कुणा आंधळ्याची काठी
खाली पडली तर
ती उचलून देण्याइतकी
तुझ्या मनात दया असू दे!

तू काही खात असताना
तुझ्या दारासमोर
एखादा भुकेला आलाच तर
त्याला काही देण्याइतकी
तुझ्या मनात दया असू दे!

बालमित्रा, तू लहान असलास
तरी, तुझे मन मोठ्ठे व्हवे
याची तयारी करायलाच हवी
म्हणून तुझ्या मनात आत्तापासूनच
सगळ्याविषयी दया असू दे!

**अरूण वि. देशपांडे**
'वरदान' ४/ श्रीरामनगर, परभणी ४१४०१

# थांबला तो संपला

कवी 'माधव ज्यूलियन यांनी हिंदपुत्रांना संदेश दिला आहे ते म्हणतात–

''कायदा पाळा गतीचा,
काळ मागे लागला,
थांबला तो संपला''

या ओळीतील आशय माणसाला प्रयत्नांसाठी प्रेरक आणि मार्गदर्शक असाच आहे. समर्थ रामदास स्वामींनीही,

''केल्याने होत आहे रे
आधि केलेचि पाहिजे!''

असे म्हणून प्रयत्नवादाचे समर्थन केले आहे. आळस आपल्या अंगीकृती कार्याचा बोजवारा उडवितो, प्रयत्नशील माणसाला जगात अशक्य असे काहीच नाही. फिनिक्स पक्ष्याने आकाशात झेप घ्यावी, त्याप्रमाणे जपानसारख्या छोट्या राष्ट्राने राखेतून झेप घेतली, ती प्रयत्नवादाच्या बळावरच!

भारतासारख्या विकसनशील देशाचे रहिवासी असलेल्या आपल्याला, माधव ज्यूलियनांनी दिलेला वरील संदेश डोळ्यांपुढे ठेवण्याची, नितांत आवश्कता आहे. आज अमेरिका, जपान, फ्रान्स, जर्मनी इ. विकसित राष्ट्रे आपल्या कितीतरी पुढे आहेत. परस्परांवर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नांतून आज ती राष्ट्रे, अधिक प्रगत तंत्रज्ञान, अधिक प्रगत साधने, निर्माण करीत आहेत.

ही सर्व साधने खपविण्यासाठी बाजारपेठ कुठली? कुठे आहे एवढी मोठी बाजारपेठ? आहे ना! आपला भारत देश! आपला देश हीच या राष्ट्रांसाठी मोठी बाजारपेठ आहे. आपण कदाचित म्हणाल, ''त्यात गैर काय? अधिक चांगल्या कंपन्याचा, अधिक चांगला माल आपल्याला मिळू शकतो तर त्यात गैर काय?'' बरोबर आहे तुमचं म्हणणे आणि इतर भारतीयांचीही हीच मानसिकता लक्षात घेऊन, या बहुराष्ट्रीय कंपन्या पद्धतशीरपणे आपले जाहिरात तंत्र अवलंबितात, ' बिलिव्ह इन द बेस्ट' 'लेटस् मेक थिंग्ज बेटर', 'वुई ब्रिंग गुड थिंग्ज टू लाईफ' किती छान वाटतात ना ही त्या कंपन्यांची बोधवाक्ये! आपण त्यांना भुलतो, त्यांची झोळी भरतो आणि आपले राष्ट्रीय उद्योग थंडावतात.

यात ग्राहकांचाही काही दोष नाही. आपल्या राष्टीय कंपन्यांनीच आपल्या मालाचा दर्जा उंचविला पाहिजे. गती हाच कंपनीचा पाया आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. सतत प्रयत्नशील राहणे, हे विकासाचे सूत्र आहे.

ही उद्यमशीलता माणसाने मुंगीकडून शिकावी. मुंगीसारखा क्षुद्र प्राणीही सतत कार्यमग्न राहून, भावी काळाची तजवीज करतो. उद्योगात मग्न असणारी मुंगी, वाटेतील अडथळ्यांवर मात करून, प्रसंगी त्यांना वळसा घालून पुढेच जाणारी नदी, क्षितिजाचा वेध घेण्यास निघालेला पक्षी, अशा निसर्गाकडून माणसाने उद्यमशीलतेचे महत्त्व शिकावे. 'गतीशिवाय जीवन म्हणजे प्राणांशिवाय शरीर'. वादळ– वाऱ्यात उद्ध्वस्त झालेले आपले घरटे पाहून, चिमुकला पक्षी थोडाच उद्ध्वस्त होतो?

'अरे बचेंगे तो और भी लढेंगे। असे म्हणणाऱ्या दत्ताजी शिंदेच्या जिद्दीने आपण लढत राहिले पाहिजे. जगाच्या इतिहासाच्या पानोपानी डोकावले तो आपल्याला श्रेष्ठ कलावंत, श्रेष्ठ नेते, संशोधक याच जिद्दीने लढल्याचे दिसून येते. पंडित नेहरुनी म्हटल्याप्रमाणे,

From confusion comes clarity;
From failure comes victory;
From struggle comes progress;

गोंधळातून सुस्पष्टता निर्माण होते; अपयशानंतर विजय, यश मिळते; संघर्षानंतर प्रगती होते. म्हणून आपण येणाऱ्या संकटांशी संघर्ष करीत राहिले पाहिजे, गतिमान राहिले पाहिजे. आळशी माणसाला प्रत्यक्ष परमेश्वरही साहाय्य करीत नाही.

म्हणूनच, काळाच्या गतीचा कायदा आपण पाळला पाहिजे. कारण, काळ आपल्या मागे लागला आहे. जो थांबेल तो संपणार आहे. काळाबरोबर राहण्यासाठी आपल्याला धावलेच पाहिजे. कारण,

***'धावत्याला शक्ती येई
आणि रस्ता सापडे!'***

●●

**चि. विवेक बुवा**
सरस्वती मंदिर, कल्याण, ठाणे
(हस्तलिखित स्पर्धा– ९८–९९)

आधी कष्टाचे दुःख सोसिती। ते पुढे सुखाचे फळ भोगती। आधी आळसे सुखकर्ता। त्यापुढे दुःख।

(पान ८ वरून पुढे चालू)
धडपड्या मुलगा शाळेत होता म्हणे.' तिथेच शेजारी मुख्याध्यापकांचं कार्यलय आहे.'' सदानंदाला भरून आलं. आपण निमित्तमात्र होतो. आपण फक्त मुलांचं संघटन केलं, मुलांना केवळ विचार करायला प्रवृत्त केलं. त्यांना चांगली दिशा दिली. त्यावेळी 'संस्कृत' शिकवणाऱ्या बाई म्हणायच्या, 'योजकस्तत्र दुर्लभ:' त्याप्रमाणे आपण फक्त डोक्याने योजना लढवल्या.पण आपण गाव सोडून गेल्यावरही आपल्यासारखेच अनेक 'योजक' शाळेत निर्माण झाले. त्यांनीच शाळेचा स्तर उंचावला. सदानंदाचे पाय कोपऱ्याकडे वळले.

''सर, आत येऊ?'' सदानंदाने कार्यालयाच्या दाराशी उभे राहून विचारलं.

''कोण? तू...तू सदानंदचा ना? ये ये.'' सर म्हणाले. सदानंदाने सरांना लवून नमस्कार केला, तर सरानी त्याला जवळ घेऊन थोपटलं. सदानंदाने सरांकडे पाहिलं. सर थकले होते, त्यांचे सर्व केस पांढरे झाले होते. हसत हसत ते म्हणाले,

''काय सदानंद, कधी शाळेत रूजू होतोयंस?''

सदानंद चकित झाला. सर पहिलाच प्रश्न विचारतील, असं त्याला वाटलं नव्हतं.

''मोठा झाल्यावर याच शाळेत शिक्षक म्हणून येईन,असं तू म्हणाला होतास आणि आम्हालाही एका शिक्षकाची गरज आहे. तू अगदी वेळेवर आलास.'' सरांनी पुस्ती जोडली.

''होय सर. उदद्यापासून येऊ का?'' सदानंद म्हणाला.

''उद्या नाही आता लगेचच! मुलांनी 'प्रकल्पांचं प्रदर्शन' भरवलं आहे. तिथे एक परीक्षक हवाय्. तूच ते काम कर. जा माझ्या घरी जाऊन चहा-नाष्टा घे आणि लगेच सभागृहात हजर हो.'' सरांनी आज्ञाच केली.


''हो पण सभागृह कुठे आहे?'' सदानंद. ''अरे ह्या 'कोपरा'च्या पलीकडे - नव्या इमारतीत.'' सहजपणे सर म्हणाले. मोहिनी पडल्याप्रमाणे सदानंदाची पावलं 'कोपरा'च्या दिशेने पडू लागली.

••

**सौ. आश्लेषा महाजन**
२३० चित्ररेखा सोसो.,
सहकारनगर नं.१ पुणे९

# दुर्बुद्धी-सुबुद्धी

शुभदा गोगटे



घराबाहेर पडताच अजयनं घराचे दार अगदी हलकेच लावून घेतलं. बाहेर शांताराम त्याची वाट बघत उभाच होता. ''चल'' अजय म्हणाला आणि ते दोघे शाळेच्या दिशेनं पळत सुटले.

अजयनं रात्री आईला सांगितलं होतं की, दुसऱ्या दिवशी पहाटे उठून तो पक्षी निरिक्षणाला जाणार आहे. त्यावर आईनं विचारलं होतं.

''परत? आता १०-१२ दिवसांपूर्वी तर तुम्ही निरीक्षणाला गेला होतात ना; देशपांडे सरांबरोबर?''

''अग आई, मागच्या वेळेला तळ्याच्या एका बाजूलाच आम्ही थांबलो होतो. आता पार वरच्या बाजूला जायचं आहे... अीण उद्याचा सगळा अभ्यास झाला आहे माझा....'' अजयनं आईला पटवलं.

कारण, पक्षी निरीक्षणाला जायचं हे खरं होतं . पण ते देशपांडे सरांबरोबर नव्हे, तर शांताराम बरोबर जायंच होतं. तेही शाळेने नवीनच घेतलेली दुर्बीण शाळेच्या प्रयोगशाळेतून गुपचुप बाहेर काढून, ती बरोबर घेऊन. कोणाला पत्ताही लागू न देता,उजाडायच्या आत गावाबाहेर पडायचं होतं.

देशपांडे नववी-दहावीला, विज्ञान शिकवित होते आणि त्याच्या जोडीला पुस्तकांबाहेरचंही पुष्कळ ज्ञान मुलांना देत होते. अभ्यासक्रमात नसलेल्याही कितीतरी गोष्टी मुलांकडून करून घेत होते. त्यांच्या आग्रहामुळे शाळेनं,पक्षी निरीक्षणासाठी एक शक्तीशाली दुर्बीण नुकतीच घेतली होती. दुर्बीण येताच सरांनी, मुलांच्या एका गटाला पक्षी निरीक्षणासाठी नेऊनही आणलं होतं. अजय त्या गटात होता. देशपांडे सरांच्या शिकवण्यावर आणि या उपक्रमांवर मुलं खुश होती आणि देशपांडेसर अजयवर खुश होते.

प्रयोगशाळेत प्रयोगांसाठी उपकरणांची मांडणी करणं, तक्ते बनवणं, सर्व साहित्य व्यवस्थित, जागच्या जागी ठेवणं, अशा कामांमध्ये ते नेहमी त्याला हाताशी घेत. कधी कधी तर, प्रयोगशाळा बंद करण्याचं कामही ते त्याच्यावर सोपवत असत.

तसंच कालही त्याला प्रयोगशाळा बंद करून, किल्ली घरी आणून द्यायला सांगितली होती .

अजयनं किल्ली खिशात घालून घरी नेली होती. दुर्बीण गुपचुप नेल्याखेरीज, शांतारामला दुर्बीणीतून, अगदी जवळून पक्षी बघण्याचा आनंद मिळू शकला नसता. कारण त्यानं सहा महिन्यापूर्वीच शाळा सोडली होती आणि तो त्यांच्या वडिलांबरोबर वीटभट्टीवर कामाला जाऊ लागला होता.

अजयची आणि शांतारामची अगदी पहिलीपासून जोडी जमली होती. शांतारामची गरिबी त्याच्या मैत्रीच्या आड कधीच आली नव्हती. पण त्याच्या शिक्षणाच्या आड मात्र आली होती. शाळा सोडली तरी शांताराम ,दर २-४ दिवसांनी अजयला गाठून त्याच्या तोंडून, शाळेच्या हकिकती आसुसलेपणानं ऐकत असे. शाळेनं शक्तिशाली दुर्बीण घेतल्याचं आणि त्यातून पक्षी अगदी हाताच्या अंतरावर दिसत असल्याचं ऐकून तो म्हणाला होता, ''अज्या, मला पण बघायचेत रे पक्षी दुर्बीणीतून'' आणि मग त्या दोघांनी मिळून हा बेत ठरवला होता.

दोघं पळत शाळेपाशी पोचले. कंपाऊंडच्या मागच्या भिंतीवरून उड्या मारून आवारात शिरले. कारण पुढच्या फाटकाच्या जवळ रखवालदाराची खोली होती. आवाज न करता हलक्या हातानं अजयंन कुलूप काढलं. दुर्बीण त्यानंच उचलून ठेवली होती. त्यामुळे नेमकी जागा त्याला माहीत होती. दिवा न लावताच त्यानं दुर्बीण काढून घेतली, परत हलक्या हातानं प्रयोगशाळेला कुलूप लावलं आणि परत मागच्या भिंतीवरून उड्या मारून ते तळ्याच्या दिशेने पळत सुटले.

ते तळ्याशी पोहोचले तेव्हा, उजडायचं होतं. ते फारच लौकर आले होते. उजेड पसरू लागल्या खेरीज पक्षी जागे होणार नव्हते, तळ्यावर येणार नव्हते. आता काय करावं?

शांताराम म्हणाला,''अज्या चल आपण तळ्याच्या त्या वरच्या अंगाला जाऊया.''

''चल जाऊया '', अजय म्हणाला आणि रमत गमत , मध्येच उड्या मारत ते तळ्याच्या कडेकडेने जाऊ लागले.

एव्हाना फटफटू लागलं होतं. आता इथेच थांबावं असं ठरवून, ते काठांवर जरा उंचशी जागा शोधू लागले.

जागेसाठी इकडे तिकडे नजर फिरत असताना, ओढ्याच्या मुखाशी काहीतरी हालचाल होत असलेली यांच्या लक्षात आली आणि दोघंही तिकडे बघू लागले.

अजून नीट उजाडलं नव्हतं. पण उजेड थोडा थोडा वाढत होता. त्या वाढत्या उजेडात त्यांना दिसलं की, कोणीतरी प्राणी किंवा पक्षी खुरडत खुरडत पाण्याच्या दिशेने जातो आहे. उत्सुकतेनं दोघंही तिकडे वळले, ते त्याच्यापासून बारा-पंधरा फुटांवर आल्यावर, त्याला त्यांची चाहूल लागली आणि त्याचा पाण्याचा दिशेने खुरडण्याचा वेग वाढला. त्याच्या जोडीला त्याचे पंखही फडफडू लागले, पण त्याला उडता काही येत नव्हतं आणि त्याचे पंखही चमत्कारिक होते. म्हणजे ते उघडल्यावर पसरत नव्हते. त्यांचा आकार वाढत नव्हता तर होता तेवढाच आणि तसाच राहत होता.

हा काय चमत्कारिक पक्षी आहे बुवा, अस मनात म्हणतच अजय आणि शांताराम पुढे जात राहिले. त्या पक्ष्यानं जोरात पळण्याचा एक प्रयत्न केला, पंखांची बरेचदा उघडझाप केली आणि शेवटी दमल्यासारखा तो स्वस्थ बसून राहिला.

ते दोघे पक्ष्या जवळ पोचले आणि अजय उद्‌गारला,

''शांत्या, काय आहे रे हे?''

त्यांच्यासमोर जमिनीवर पडलेला पक्षी, हा पक्षी वाटत नव्हता की प्राणी वाटत नव्हता. एखाद्या मोठ्या बदकाएवढ्या आकाराचा तो असला, तरी त्याची चोच मोठी आणि पोपटासारखी वळलेली होती. डोकं त्याच्या खांद्यांत रूतल्यासारखं होतं आणि डोक्यावर एक मांसल तुरा होता. पण सर्वात चमत्कारिक गोष्ट होती, ती म्हणजे त्याच्या दोन पायांना नख्या नव्हत्या तर घोड्यासारखे खूर होते. शिवाय पंखांवर पिसं नव्हती तर. त्रिकोणी तुकडा असल्यासारखा होता. खेळण्यातल्या पक्ष्याला असावा तसा, पंखांचा रंग काळा होता आणि अंगभर काळ्या - पांढऱ्या रंगाचे मिश्रण होतं.

अजय आणि शांताराम अवाक् होऊन बघत राहिले. तो पक्षीही आपल्या निस्तेज डोळ्यांनी, त्यांच्याकडे बघत बसून राहिला.

''अज्या, खरंच काय आहे रे हे? असा पक्षी तर आपण पूर्वी कधीच पाहिलेला नाही.'' शांताराम म्हणाला.

''हा पक्षी आहे का? की प्राणी आहे? किती कसा तरी दिसतो आहे नं?''

''मांजरासारखे केस आहेत पंखांवर मऊ असतील का? त्याचे केस?'' बोलता बोलता शांतारामनं पुढे होऊन पक्ष्याच्या पंखास हात लावला. त्याच्या स्पर्शाबरोबर , पक्षी एकदम धडपडत उठला आणि पाण्याच्या दिशेनं पळण्याचा प्रयत्न करू लागला. पण ५-६ फुटांतच त्याची ताकद संपली आणि तो कोलमडला.




निर्मल निर्भर वातावरणी, धुके तरंगे धूसर धूसर, झगमगते अन् नक्षी त्यावर, सोनेरी किरणांची सुंदर.

''ए, हात लावू नकोस रे त्याला, भितो तो.'' अजय म्हणाला.

''कुठला पक्षी आहे हा, अज्या?''

''कुणास ठाऊक. मी तर कधी पाहिलेला नाही आणि सरांनी जे वेगवेगळ्या पक्ष्यांचे फोटो दाखवले आम्हाला, त्यात असा पक्षी एकही नव्हता.''''आणि आला कुठून हा? की इथेच राहतो?''''मला नाही वाटत तो इथला असेल. इथले किती तरी पाणपक्षी आम्ही पाहिलेले आहेत. आणि पक्ष्यांचे पाय कधी असे असतात का? घोड्यासारखे?''

''पण मग... हा... काय आहे?'' गोंधळून दोघं जरा वेळ तसेच पक्ष्याकडे बघत उभे राहिले आणि मग शांताराम म्हणाला,''असे आणखी पण पक्षी प्राणी असतील का रे? बघूया का आपण पुढे जाऊन?''

''चल'' अजय म्हणाला आणि दोघं ओढ्याच्या काठाकाठानं वरच्या दिशेला चालू लागले. इथपर्यंत ते पूर्वी कधी आले नव्हते. त्यामुळे बिचकत बिचकत ते चालत होते. हळूहळू वाटेत पडलेले पक्ष्यांचे अवशेष सापडू लागले. कुठे एखादा खूर, कुठे पंखाचा तुकडा तर कुठे चोचीचा तुकडा. म्हणजे आणखीही पक्षी त्या परिसरात होते. ते काही अंतर गेले आणि एकदम एक बैठी एकमजली इमारत, त्यांच्या उजव्या हाताला, नजरेच्या टप्प्यात आली.

''शांत्या, हे बघ,'' अजय म्हणाला आणि दोघंही चकित नजरेनं बघत उभे राहिले. गावापासून इतक्या दूर, जिथे कोणी जात येत नाही , अशा ठिकाणी, रानात झाडीमध्ये व्यवस्थित पक्की बांधलेली इमारत दिसणं इतकं अनपेक्षित होतं की, काही वेळ दोघंही नुसते बघत राहिले.

त्या दोघांची उत्सुकता आणि उत्साह त्यांना गप्प बसू देईना. पुढे जाऊन काय ते बघायचं, असं त्यांनी ठरवलं. मनात थोडी धास्ती होती. त्यामुळे आसपास कोणीही नव्हतं , तरी आजूबाजूला बघत बघतच ते इमारतीकडे निघाले. दोघेजण तिथल्या बंद फाटकापाशी थांबले.

एव्हाना उजाडलं होतं. समोरचं सगळं स्पष्ट दिसत होतं. इमारतीच्या अंगणात एक मोठा हौद होता. हौदाच्या बाजूला एक मोठा चौथरा होता. अजयच्या मनात काही विचार घोळत असतानाच काहीतरी यंत्र सुरू झाल्याचा आवाज येऊ लागला आणि काही मिनिटातच त्या चौथऱ्याच्या बाजूच्या भिंतीमध्ये हौदाच्या बाजूने मीटरभर लांबी रुंदीचे चौकोनी तुकडे खटाखट उघडून जमिनीवर आडवे पडू लागले . अजय आणि शांतारामला दिसणाऱ्या भागांमध्ये असे चार तुकडे उघडले.

म्हणजे ते दरवाजे होते तर! आणि ते चौथरे नसून काहीतरी ठेंगणं बांधकाम होतं.

उघडलेल्या एक दरवाजामधून दोन माणसं वाकून बाहेर आली. एखाद्या रखवालदाराचा असावा तसा, निळा गणवेश दोघांच्या अंगावर होता. दोघांनीही डोळ्यांना मोठे चष्मे लावले होते आणि हातात मोजे घातले होते. एकाच्या हातात एक मोठी चामड्याची बॅग होती. त्यानं ती चौथऱ्यावर ठेवून उघडली. त्यातून एक ट्रे काढला. दुसऱ्या माणसानं बॅगेतून इंजक्शनच्या नळ्या आणि सुया काढून त्या ट्रे मध्ये एकाशेजारी एक मांडायला सुरूवात केली.

फाटकात उभं राहून हे सगळं बघणाऱ्या या जोडगोळीकडे त्या माणसांचं अजून लक्ष गेलं नव्हतं. पण ते केव्हाही जाण्याची शक्यता होती. त्या धोक्याची जाणीव शांतारामला आधी झाली. त्यानं हळूच अजयचा हात दाबला आणि हळूहळू मागे सरकत ते दोघं गारवेलाच्या दाट भिंतीमागे लपले आणि पानांच्या जाळीमध्ये असलेल्या नैसर्गिक भोकांमधून बघू लागले.

चौथऱ्याजवळच्या एकानं बॅगेतून तीनचार बाटल्या काढल्या. तीनचार काचपात्रं काढली आणि बाटल्यांमधल्या द्रवाचे थेंब ड्रॉपरमध्ये घेऊन, तो त्या काचपात्रांमध्ये घालू लागला. तीन काचपात्रांमध्ये त्यानं तीन मिश्रण तयार केली आणि इंजेक्शनच्या नळ्यांमध्ये भरायला सुरूवात केली. इंजेक्शनं भरून झाल्यावर, दोघांनी मिळून बाकी सगळं सामान भरून ठेवलं आणि एकजण दुसऱ्याला म्हणाला,

''हं, चल, उघड पहिला पिंजरा.'' ''कोणता उघडू आधी? शेळ्यांचा की कोंबडयांचा?''

''कोंबड्यांचा नको बाबा आधी. त्या फार त्रास देतात. त्यांना शेवटी काढूया. आधी शेळ्या काढ.''

दुसऱ्यानं मान हलवली आणि खाली वाकून उघड्या दरवाजात हात घालून काही तरी केलं. त्याबरोबर एक लांबट आकाराचा पिंजरा, त्या दारातून बाहेर आला. त्यात चार प्राणी होते.

पण त्या शेळ्या नव्हत्या. मांजराच्या आकाराच्या त्या प्राण्यांचं फक्त तोंड शेळी सारखं होतं. मान अगदी

लहान होती आणि दोन बाजूंना दोन त्रिकोणी पंख होते बिनपिसांचे, मऊ लव असलेले. पुढच्या पायांपेक्षा मागचे पाय मोठे होते आणि खुरांना लांब लांब नख्या होत्या. शेपटी नव्हतीच.

अजय आणि शांताराम, आ वासून बघतच राहिले.

पिंजरा उघडून एका एका 'शेळी'ला बाहेर काढून ती माणसं, तिच्या मागच्या जांघेत इंजेक्शन देऊ लागली आणि बाहेर काढलेली शेळी बें बें ओरडत, सुटण्यासाठी धडपड करू लागली. इंजेक्शन देऊन झालं की, जिवाच्या आकांतानं आपल्या विजोड पायांवर उड्या मारत, त्या शेळ्या पळून जाऊ लागल्या.

चारही शेळ्यांना इंजेक्शन देऊन झाल्यावर त्यात दोघांनी दुसरा पिंजरा काढला. त्या अजय-शांतारामनं पाहिलेल्या, पक्ष्यासारखे प क्षी होते. त्यांना पिंजऱ्यातून बाहेर काढल्यावर ते 'कच् कच् कच् कच्' असा आवाज काढून ओरडू लागले, पण त्यांनी फारशी धडपड केली नाही. इंजेक्शन देऊन झाल्यावर ते धडपडत, कोलमडत पाण्याकडे जाऊ लागले.

तिसऱ्या पिंजऱ्यात कोंबड्या होत्या. त्या बाकी सगळ्या ठीक दिसत असल्या तरी, त्यांच्या पायांना बारीक बारीक खूर होते. पिंजऱ्यातून बाहेर काढल्यावर सुटण्यासाठी त्यांनी इतकी धडपड काली की इंजेक्शन देऊन होईपर्यंत त्या दोन माणसांना, अगदी नको हे काम असे झालं.

''नको हे बुवा हे कोंबड्यांचं काम.'' दोघांपैकी एकजण म्हणाला आणि ते सामान आवरू लागले. तिन्ही पिंजऱ्यांमधल्या चमत्कारिक प्राण्यांनी ती मोकळी जागा आणि पाण्याचा हौद, भरून गेल्यासारखा झाला.

''अज्या , काय आहे रे हे? हे सगळे प्राणी असे काय आहेत?''

अवाक् होऊन बघत असलेला शांताराम कुजबुजत म्हणाला. अजयनं नुसतीच मान हलवली पण त्याला थोडी थोडी कल्पना आली होती. प्राणी आणि पक्षी यांच्या संकरानं, नवीन काहीतरी जीव निर्माण करण्याचा हा प्रयत्न चालला आहे, असं त्याला वाटू लागलं होतं. जनुकांवर प्रयोग करून त्यांच्यात बदल घडवून आणून, प्राण्यांच्या शरीरात आणि स्वभावात बदल करणं शक्य आहे आणि म्हणून वेगवेळ्या असाध्य रोगांवर उपाय शोधण्यासाठी जगभर जनुक-अभियांत्रिकीचे प्रयोग सुरू आहेत, हे त्याला माहीत होतं. देशपांडे सरांनी त्यांच्या वर्गात मागच्याच महिन्यात, हे सगळं समजावून सांगितलं होतं. तसंच काहीतरी इथे चाललं असावं.

पण ते प्रयोग गावापासून इतक्या दूर लपून छपून चालले होते, ते का? तसं असलं तर मग निश्चितच काहीतरी वाईट चाललं होतं.

कोणातरी मोठ्या माणसाला सांगायला हवं, असं अजयला तीव्रतेनं वाटलं आणि तो हळूच म्हणाला.

''शांत्या, चल, आपण देशपांडे सरांना सांगू हे सगळं.''

''सरांना?'' धास्तावून शांताराम म्हणाला. ''आणि आपण दुर्बीण घेऊन आलो गुपचुप, त्याचे रे काय?''

हा मुद्दा अजय विसरलाच होता. दुर्बीण घेऊन आल्याचं कळल्यावर सर नक्कीच रागवणार होते, शिक्षा करणार होते. आपण दुर्बीण चोरली असं तर त्यांना वाटणार नाही ना?

पण तसं वाटलं तर वाटलं. आपण काही चोरी केली नाही. सर देतील ती शिक्षा आपण भोगू. पण आपण जे बघितलं ते मोठ्या माणसांना सांगितलं पाहिजे. कारण ते फार भयंकर आहे आणि त्यातून काही भयंकर निर्माण झालं तर...

ते दोघं हळूहळू मागे सरकू लागले. एव्हाना सकाळची कोवळी ऊन्हं सगळीकडे पसरली होती. त्या उन्हात त्या दोघांची हालचाल, इंजेक्शनच्या सुया आणि इतर पसारा आवरणाऱ्या दोघांच्या लक्षात आली. चमकून त्यांनी नीट निरखून बघितलं आणि आता पळू लागलेली दोन मुलं त्यांना दिसली.

''ए, ए, काय आहे? कोण आहे?'' त्यांच्यातला एकजण ओरडला.

''धर, धर त्यांना पकड, जाऊ देऊ नकोस पळून.'' दुसरा ओरडला आणि ते दोघे हातातलं काम टाकून फाटकाच्या दिशेने पळत सुटले. पण फाटकाला कुलूप होतं आणि फाटकाच्या वर काटेरी तार होती. सगळ कुंपणही काटेरी तारेचंच होतं.

कुलपाची कि ल्ली आणून फाटक उघडेपर्यंत, अजय आणि शांताराम पार दिसेनासे झाले होते. धापा टाकत , टाकत अजय आणि शांताराम गावात पोहचले. न विचारता दुर्बीण नेल्याची चूक कबूल करायची आणि प्रत्यक्ष बघितलेला प्रकार, सरांना सांगायचा असं दोघांनी ठरविलं.

एव्हाना सकाळचे दहा वाजायला आले होते. देशपांडेसर शाळेत निघायची तयारी करीत होते. अजय आणि

शांतारामला भांबावलेल्या स्थितीत पाहून, त्यांना खूपच आश्चर्य वाटले.

थोडावेळ दम खाऊन, तळ्याच्या काठी जंगलात बघितलेला सर्व प्रकार अजयने देशपांडेसरांना सांगितला. अजय सांगत असलेली ही घटना व माहिती पूर्ण बेकायदेशीर होती. प्रयोग करणाऱ्या त्या व्यक्ती, सरांना संशयित वाटल्या. देशपांडेसरांनी ताबडतोब जिल्हाधिकाऱ्यांना फोन लावला.

अजय व शांताराम मुख्याध्यापक राक्षेंच्या कार्यालयात बसले होते. थोड्याच वेळात देशपांडेसरही आले आणि त्यांनीच बोलयला सुरूवात केली,

'इन्स्पेकटर रावते आणि मी, आताच जिल्हाधिकाऱ्यांना भेटून आलो. थेट त्यांच्याकडे गेल्यामुळे, सगळी कारवाई झटपट झाली. काय काय झालं ते सगळं मी थोडक्यात सांगतो- आपल्या या भागात कोणत्याही अशा प्रकारच्या संशोधन शाळेची नोंद झालेली नाही. तेव्हा या मुलांनी जे बघितलं ते बेकायदेशीर तर नक्कीच आहे. आपल्या बेकायदेशीर कामाचा सुगावा मुलांना लागला आहे, हे त्या व्यक्तींनीही पाहिलं होतं. मुलं पोलिसांना घेऊन यायच्या आत, पळून जाण्याचीच तयारी ते करत होते. मात्र पोलिसांना तातडीने कारवाई केल्यामुळे, हे बेकायदेशीर संशोधन करणाऱ्या गुन्हेगारांना आतापर्यंत अटकही झाली असेल. त्यांच्या सर्व ठिकाणांवर पोलिसांनी छापा घातला आहे.''

इतकं बोलून ते थबकले आणि पुढे म्हणाले ,''आता राहिला प्रश्न या मुलांचा.''

दोन्ही मुलांनी काही न बोलता माना खाली घातल्या. तेव्हा ते पुढे म्हणाले, तुम्ही एक बेकायदेशीरपणे चाललेला भयंकर प्रकार उघकडीस आणलात, याबद्दल तुमचं कौतुक करावंस वाटतं. पण तुम्ही स्वत: बेकायदेशीर काम केलं त्याचं काय? त्याची शिक्षाही तुम्हाला मिळायला हवी.''



देशपांडेसर म्हणाले,''आणि काय रे शांताराम, तू मला विचारलं असतंस तर मी तुलाही पक्षी निरीक्षणाला नेलं नसतं का? त्यासाठी दुर्बीण पळवण्याची दुर्बुध्दी तुम्हाला का झाली? अं?'' मग थोड थांबून ते पुढे म्हणाले,''शिक्षा तुम्हाला मिळावायलाच हवी. पण एक भयंकर प्रकार तुम्ही उघडकीस आणलात, आपली चोरी पकडली जाईल हे माहीत असूनही तुम्ही हे सर्वांच्या हिताचं काम केलंत, तुम्हाला सुबुध्दी झाली, म्हणून शिक्षेचे स्वरूप आम्ही सौम्य ठेवणार आहोत.''

इतकं बोलून त्यांनी राक्षेसरांकडे पाहिलं. राक्षेसर म्हणाले,


''उद्यापासून प्रयोगशाळा झाडून पुसून स्वच्छ ठेवण्याचं काम, दोन महिने अजयनं करायचं आहे आणि गेल्याच आठवड्यात शाळेनं आणलेल्या अशोकाच्या झाडांसाठी , फाटकापशी ओळीनं आठ खड्डे करून, त्यात रोपं लावायचं काम, शांताराम तू करायचं आहेस. तुझं वीटभट्टीवरचं काम संपलं की मग फावल्या वेळात तू हे काम करायचं आहेस.''

''आणि बरं का रे मुलांनो, पक्षी निरीक्षणाच्या प्रत्येक कार्यक्रमात शांतारामलाही आपण बरोबर घेऊन जात जाऊया.''

राक्षेसर म्हणाले. त्याबरोबर अजय आणि शांतारामचे चेहरे एकदम फुलले.

थोड्या वेळानं हसतमुखानंच सर्वजण कार्यलयातून बाहेर पडले, तेव्हा शांतारामच्या मनात आलं, 'वाईटातून चांगलंही बाहेर पडतं म्हणतात, ते यालाच तर नाही?' ●●

**सौ. शुभदा गोगटे**
१२०२ ब, सदाशिव पेठ, पुणे ४११




**नि**सर्गाचा एक अद्भुत चमत्कार म्हणजे खग्रास सूर्यग्रहण होय. चंद्र-सुर्याचा क्वचित दिसणारा हा लपंडाव, अतिशय प्रेक्षणीय असतो. प्रखर सुर्यबिंबाला, गुपचुपपणे झाकणारे अमावस्येचे चंद्रबिंब, सूर्याचे एक आगळेवेगळे रूप आपल्याला दाखविते. ''हे रूप प्रत्यक्षपणे पाहणे म्हणजे जन्माचे सार्थक होणे'', असे गेल्या चार वर्षापूर्वी दिसलेल्या खग्रास सूर्यग्रहणाच्या पट्ट्यात हजर असलेल्या, प्रत्येक व्यक्तीला वाटत होते. ही सर्व ग्रहण वेडी माणसे, या वर्षी ११ ऑगस्ट ९९ ला दिसणाऱ्या ग्रहणात, नक्कीच ग्रहणपट्ट्यात हजर राहतील. या सर्वांना असे काय वेगळे दिसले होते? किंवा त्यांना असा कुठला अनुभव आला होता?

चार वर्षापूर्वी दिवाळीच्या अमावस्येच्या दिवशी, खग्रास सूर्यग्रहण घडले होते. या दिवशी अनेकांनी राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार आणि प. बंगाल मधून गेलेल्या, पन्नास किलामीटर रुंदीच्या ग्रहणपट्ट्यात, गर्दी केली होती. सकाळी साडेआठच्या सुमारास निळ्याभोर आकाशात दिसलेले काळे सूर्यबिंब, त्या भोवतालची तेजस्वी प्रभावळ व दोन वेळा दिसलेली ''डायमंड रिंग'' अनेकांच्या मनात , कायमची घर करून राहिली. ग्रहण पाहायचे सर्वांनीच नक्की केले. हां हां म्हणता चार वर्षे गेली व पुढील ग्रहण काही महिन्यांवर येऊन ठेपले. परदेशी मासिकात, येत्या ग्रहणाच्या सहलीविषयी जाहिराती येऊ लागल्या. हौशी आकाश निरीक्षक, ग्रहणपट्ट्यात जाऊन कोठून ग्रहण पाहायचे, हे ठरवू लागले. देशभरातील संस्था व पुण्याची ''आयुका'' या ग्रहणाच्या तयारीला लागल्या आहेत.

खग्रास सूर्यग्रहण हा निसर्गाचा अभूतपूर्व चमत्कार असतो. प्रत्यक्षात आकाराने वेगवेगळ्या असलेल्या, चंद्र-सूर्यांनी एकमेकांना झाकल्यामुळे ग्रहण घडते. सूर्याचा व्यास चंद्राच्या व्यासापेक्षा ४०० पट मोठा आहे. मात्र सूर्य हा चंद्रापेक्षा ४०० पटच दूर असल्याने, चंद्र-सूर्य साधारणपणे एकाच आकाराचे आपल्याला दिसतात. अमावस्येच्या दिवशी, चंद्रबिंब सूर्यासमोर प्रवास करताना, सूर्याला झाकल्यास ग्रहण घडते. यावेळी चंद्राची सावली पृथ्वीवर पडते. चंद्रछायेचा आकार छोटा असल्याने, पृथ्वीवरील छोट्याशा पट्ट्यातच खग्रास ग्रहण दिसते व इतरत्र खंडग्रास ग्रहण दिसते. चंद्राची सावली वेगानं प्रवास करीत असल्याने, जास्तीत जास्त साडेसात मिनिटे, खग्रास सूर्यग्रहण दिसू शकते. या छोट्याशा कालावधीत चंद्राने सूर्याला झाकल्यामुळे, कधीही न दिसणारा सूर्यबिंबाभोवतालचा ''किरीट'' किंवा ''करोना'' पाहायला मिळतो. प्रत्येक ग्रहणात या किरिटाचा आकार वेगवेगळा दिसत असल्याने, प्रत्येक ग्रहण वेगवेगळे व वैशिष्ट्यपूर्ण असते. दिवसाढवळ्या आकाशात दिसलेले काळसर सूर्यबिंब व बुध, शुक्र यासारखे ग्रह आणि तेजस्वी तारे, आकाशात अल्पकाळ चमकू लागल्यावर ग्रहणपट्ट्यातील माणसे, निसर्गाचा हा गूढ चमत्कार पाहून संमोहित होतात. कुठलेही फोटो, फिल्म किंवा टि.व्ही. हा आविष्कार संपूर्णपणे दाखवू शकत नसल्याने, अनेक खग्रास पट्ट्यात ग्रहण पाहण्यासाठी गर्दी करतात. काही सेकंदभरचा निसर्गातील ग्रहगोलांचा लपंडाव पाहून, मंत्रमुग्ध होतात. हा निसर्गाचा आविष्कार अधूनमधून कुठे ना कुठे तरी दिसतच असतो. मात्र एखाद्या ठिकाणी खग्रास सूर्यग्रहण दिसले, तर तेथे ३५० वर्षे पुन्हा खग्रास सूर्यग्रहण दिसत नाही, तसेच ग्रहणपट्ट्याची रुंदी, अवघी शे-दिडशे किलोमीटर असल्याने, खग्रास ग्रहण पाहण्यासाठी दूरदूर जावे लागते. एकोणिसाव्या शतकात भारतात फक्त चार खग्रास


सूर्यग्रहणे दिसली होती, तर या शतकात १९१४, १९५२, १९८० व १९९५ मध्ये ग्रहण दिसले . या शतकातील शेवटचे ग्रहण, पुढील वर्षी होत आहे. यानंतर भारतात २२ जुलै २००९ मध्ये व त्यानंतर २० मार्च २०३४ मध्ये, खग्रास सूर्यग्रहण दिसले.बुधवार. ११ ऑगस्ट ९९ रोजी दिसणारे खग्रास सूर्यग्रहण, सूर्योदयी पश्चिम अटलांटिकमध्ये सुरू होत आहे. येथे पन्नास किलोमीटर रुंदीच्या पट्ट्यातून ४७ सेकंदाचे ग्रहण दिसले. नंतर चंद्राची सावली, सिसिली व ब्रिटनच्या दक्षिण पश्चिम किनाऱ्यावर येऊन थडकते. येथे दोन मिनिटांची खग्रास अवस्था दिसेल. तेथून चंद्रसावली, ब्रिटनची खाडी ओलांडून उत्तर फ्रान्समध्ये पोहचेल. पॅरिसपासून ३० किलामीटर अंतरावरून प्रवास करून चंद्राची सावली बेल्जियम, लक्झेंबर्ग आणि जर्मनीत दाखल होईल. या वेळी ११० कि.मी. रुंदीच्या पट्ट्यात २ मिनिटे १७ सेकंद खग्रास सूर्यग्रहण दिसेल. म्युनिचपासून २० किलोमीटर अंतरापासून चंद्रसावली प्रवास करीत आल्प्समध्ये शिरेल व तेथून ती ऑस्ट्रिया य नंतर हंगेरीमध्ये थडकेल. यानंतर चंद्रछाया युगोस्लाव्हियामधून रूमानियामध्ये या खग्रास ग्रहणाचा काळ जास्तीत जास्त म्हणजे, २ मिनिटे २३ सेकंदाचा असेल. येथे ११२ किलोमीटर रुंदीच्या पट्ट्यात खग्रास सूर्यग्रहण दिसेल. सेकंदाला



पृथ्वीवरुन जाणारा ग्रहणाचा पट्टा

०.६८ किलामीटर वेगाने प्रवास करीत, चार मिनिटात खग्रास अवस्था, बुखारेस्टला पोहोचल. तेथून ती ब्लॅक सी मधून प्रवास करून, तुर्कस्थानात पोचेल. येथे २ मिनिटे १५ सेकंद खग्रास अवस्था दिसेल. तेथून चंद्रछाया सायरिया व इराकमध्ये जाईल. इराकमध्ये २ मिनिटे ५ सेकंदांची खग्रास अवस्था दिसल्यानंतर सावली इराणमध्ये पोहोचेल. इराणचा भूप्रदेश पार करण्यास, सावलीस अर्धातास वेळ लागेल.

भारतीय वेळेप्रमाणे, संध्याकाळी ५ वाजून ५२ मिनिटांनी चंद्रछाया पाकिस्तानामध्ये दाखल होईल. कराचीमध्ये १ मिनिट १३ सेकंदांची खग्रास अवस्था दिसल्यानंतर, काही मिनिटांतच सावली भारतात पोचेल. संध्याकाळी ५ वाजून ५८ मिनिटांनी चंद्राची छाया, कच्छच्या रणात लखपत व खावडा गावांच्या परिसरात पोचेल. या ठिकाणी १ मिनिट ७ सेकंद खग्रास ग्रहण दिसेल. चंद्राची सावली आता काहीशी मंद वेगाने म्हणजे सेकंदाला २ कि.मी. वेगाने बडोद्याकडे सरकेल. बडोद्यामध्ये, संध्याकाळी सहा वाजता १ मिनिट २




**दक्षिण आशियातून जाणारा ग्रहणाचा मार्ग**

सेकंदांचे खग्रास सूर्यग्रहण दिसेल. तेथून सावली संखेडा, खेटिया, यावला, या गावांमधून भुसावळ, अकोल्याकडे येईल. या भागात ६० ते ५५ सेकंदाची खग्रास अवस्था संध्याकाळी ६ वाजून ४ मिनिटांनी दिसेल. यवतमाळ, चंद्रपूरमधून प्रवास करून, जगदाळपूर पैकोंडमार्गे सावली विशाखापट्टणच्या उत्तरेला, बंगालच्या उपसागरात जाईल. तेथून ती संध्याकाळी ६ वाजून ६ मिनिटांनी पृथ्वी सोडून नाहीशी होईल. याप्रमाणे चंद्राची सावली १४००० किलोमीटर लांबीचा प्रवास , ३ तास ७ मिनिटात पूर्ण करून, ०.२ टक्के पृथ्वीच्या भागातून खग्रास सूर्यग्रहण घडवेल.

गेल्या ग्रहणात म्हणजे २४ ऑक्टोबर ९५ रोजीच्या ग्रहणात, ७२ ते ८५ टक्के सूर्यबिंब झाकले गेल्याचे महाराष्ट्रातून दिसले होते. महाराष्ट्रात कोठेही खग्रास ग्रहण दिसले नव्हते. यावेळी ९५ टक्के सूर्यबिंब झाकले गेल्याचे महाराष्ट्रातून दिसले तर, खग्रास अवस्थेचा पट्टा महाराष्ट्राच्या उत्तरेकडच्या भागातून जात असल्याचे, येथून खग्रास ग्रहण एक मिनिटभर पाहता येईल. महाराष्ट्रात सूर्य पश्चिम क्षितिजावर अवघा दहा ते पंधरा अंश उंचीवर असताना, संध्याकाळी खग्रास अवस्था दिसणार आहे. तसेच या काळात, महाराष्ट्रात, मान्सूनच्या पावसाचा जोर असल्यास, ग्रहण दिसण्याची शक्यता कमी आहे. याउलट कच्छच्या रणात गेल्यास, सूर्य सुमारे १८ अंश उंचीवर असून, तेथे १ मिनिट ७ सेकंदाची खग्रास अवस्था दिसण्याची शक्यता असल्याने व हवामान महाराष्ट्रापेक्षा चांगले राहण्याची शक्यता असल्याने, हौशी आकाश निरीक्षक सौराष्ट्रामध्ये नक्कीच गर्दी करतील.

••

**डॉ. प्रकाश तुपे**
'गंगासागर' ८७५, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

# ‘ठसा’ अभ्यासहलीचा

**बागेश्री पोंक्षे**

**प्र**बोधिनीतील अभ्यासहली, अनेकविध अनुभव थेट विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या मनापर्यंत पोहोचवणाऱ्या असतात. काही प्रसंगचित्रे, काही व्यक्तिरेखा, काही सामाजिक, काही शैक्षणिक, वैज्ञानिक क्षेत्रातील बारकावे, सूक्ष्मातले सौंदर्य, भव्यता- विराटपणा यांचा अनुभव, व्यक्ती-व्यक्तीमधील जगण्याच्या प्रेरणा आणि त्यांच्या कामातील विलक्षण वेगळेपणा, अवाढव्य बांधकामांचा अंगावर येणारा भव्यपणा तर विविध कारखान्यांतील यंत्रे व त्यामागील मानवी नियोजन अशा कितीतरी रंगछटांनी बनलेला, जराशा बदलाने वेवगळ्या आकृतीबंधांचे रूप धारण करणाऱ्या शोभादर्शीसारखे, विविध उपक्रम आपण या सहलीमध्ये अनुभवत असतो. रोजचा अनुभव वेगळा. रोजचा शोभादर्शीतील आकृतीबंध वेगळा आणि त्याचा होणारा परिणामही वेगळाच.

असे निरनिराळे अनुभव सगळ्यांनी मिळून घ्यावेत, गटाच्या एकजिनसीपणाचा अनुभव प्रत्येकाला यावा, विविध विषयांचा अभ्यास, आपल्या देशातील विविध प्रश्न-परिस्थितींचाही अभ्यास व्हावा आणि या देशस्थितीच्या अभ्यासाला भटकंतीची, प्रवासातील गंमतींची, मनमुराद गप्पांची, समान आवडी-निवडी असलेल्या आपल्याच वयोगटातील मित्र-मैत्रिणींच्या सहवासाची खुमासदार संगतही असावी अशी मुद्दामच योजना करून आपण सहलीसाठी बाहेर पडत असतो.

यंदाची बारावीच्या मुलींची अभ्याससहल ही अशीच रंगतदार झाली. ती दोन भागात विभागली गेली होती. ५ एप्रिल ते १४ एप्रिल असा दहा दिवसांचा कालावधी! विविध गावांमधील छात्र प्रबोधनच्या १० मुली व ४ मार्गदर्शकांसह सहल उत्तम रीतीने पार पडली. ५ एप्रिलला रत्नागिरी, अलिबाग, पेण असा कोकणाचा प्रवास व भेटी. त्यानंतर मुंबईपर्यंत केलेला बोटीचा प्रवास. मुंबईत गेल्यावर राजभवन, विधानभवन, टेलिफोन एक्स्चेंज, नेहरू तारांगण, सायन्स सेंटर, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, कान्हेरीची लेणी अशा कितीतरी गोष्टी गटाने पाहिल्या.

रत्नागिरीच्या समुद्रकिनाऱ्यावर घेतलेली तिन्ही किनारपट्टींच्या स्वरूपातील माहिती अन् पाहिलेली किनाऱ्यालगत राहणाऱ्या जलचर प्राण्यांची घरे, त्यांची निसर्गाशी असलेले समायोजन, जेलिफिशचा जवळून केलेला अभ्यास, मार्था क्रिस्टल या मालवाहू जहाजावरील सुसज्ज यंत्रणा व संकटसमयाची उपाययोजना तसेच पानवलचा आशियातील सर्वाधिक उंचावरील पुलावर व पुलाखाली जाऊन घेतलेला अनुभवही सगळ्यांच्या लक्षात राहिला.

कोकण रेल्वेचा प्रवास तर अविस्मरणीय वाटला. प्रवासापूर्वी कोकणरेल्वेची घेतलेली तपशीलवार माहिती, त्यातील बोगदे, पूल आणि अवाढव्य कामाचा पसारा. त्याचे बारीक- सारीक नियोजन व व्यवस्थापन याची गटाला विशेष जाणीव झाली. हाच अनुभव अलिबागचा युरीया खताचा कारखाना पाहताना आला.

अलिबाग येथे पोहोचल्यावर संपर्क व्यक्तींकडे जाऊन, ज्ञान प्रबोधिनीची माहिती सांगून, त्यांच्याकडून दिवसभराकरिता सायकल मागून घेणे त्या सायकलवरून अलिबागचा किल्ला, कान्होजी आंग्रे यांची समाधी, ^yMg/H$ dYe m m,RCFचा युरीया खताचा कारखाना व श्री. करमरकरांचे शिल्पालय पाहणे ही अफलातून कल्पना सगळ्यांनी प्रत्यक्षात आणली. अनोळखी गावात जाऊन सगळ्यांशी मैत्री करणे, त्यांना प्रबोधिनी समजावून सांगणे, त्यांच्या सायकली मागून त्यावरून प्रवास करणे हा पहिल्यांदाच घेतलेला अनुभव सगळ्यांच्या लक्षात राहिला.

बोटीने मुंबईस आल्यावर किषर्वीक जणींनी प्रथमच मुंबई पाहिली होती. विधानसभेतील लोकप्रतिनिधी तावातावाने कसे भांडत असतात अन् जणू कुस्तीचा आखडा वाटावा अशी परिस्थिती कशी असते? हे विधानभवनातील कामकाज पाहून सर्वांना जाणवले. टेलिफोन एक्स्चेंजमध्ये फोन कसे घेतले जातात. रॉंग नंबर, बदलेले नंबर असिस्टन्स या सगळ्यांचे काम कसे केले जाते, याची सविस्तर माहिती मिळविली. नेहरू तारांगण व सायन्स सेंटरमधील शास्त्रीय तत्त्वांवर आधारित खेळ, डिस्कव्हरी ऑफ इंडियाचे भव्य प्रदर्शन अशी भरपूर माहिती असलेली ठिकाणे मुंबईमध्ये प्रत्यक्षपणे पाहता आली.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व कान्हेरीची लेणी ही मुंबईतील काँक्रीटच्या जंगलामधील आश्चर्येच वाटली.

रत्नागिरी, अलिबाग, मुंबई येथील छात्र प्रबोधनच्या कार्यकर्त्यांनी मनापासूनच खूपच मदत केली. याचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो.

संपूर्ण मुंबईमधील एकूण मोठ-मोठे प्रकल्प, इमारती, सुख-सोयींनी भरलेली, चंगळवादी, लखलखाट यांच्या पार्श्वभूमीवर अभ्याससहलीचा दुसरा टप्पा खोल ठसा उमटवून गेला.

मुंबईपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या ठाणे वनवासी विभागातील वनवासी बंधूंची हलाखीची स्थिती, दारिद्र्य, उपासमार, सुखासीन नगरीच्या इतक्या जवळ असूनही अन्न-वस्त्र-निवारा अशा किमान गोष्टींपासूनही वंचित राहिलेले वनवासी आणि त्यांच्या तोंडात घासभर अन्न जावे म्हणून सर्व सुख-सोयींकडे पाठ फिरवून वर्षानुवर्षे कार्यरत असलेल्या तरूण कार्यकर्ते या सगळ्या-सगळ्यांनीच गटाला अंतर्मुख केले.

उसगाव डोंगराची विधायक संसद व श्रमजीवी संघटना, मनोरची शांती-सेवा, अभंग, तलासरी, सेल्वासा इ. अनेक भागात कार्यरत असणारी वनवासी कल्याणश्रमांची वसतिगृहे, सूत्रकार पाड्यावरील महाराष्ट्र विद्यामंदिराचे श्री. अंधेर गुरूजी यांचे काम, कोसबाड, ऐने, दाभोण येथील मा. अनुताई वाघ व मा. ताराबाई मोडक यांच्या प्रेरणेने चालू असलेली बाल-शिक्षणातील अंगणवाडी-बालवाडी-विकासवाडीची कामे, उमरगाव-बलसाड येथील श्री. भास्कर सावे यांचा नैसर्गिक शेतीचा प्रयोग, जव्हारचे प्रगती प्रतिष्ठानचे मूक बधीर विद्यालय व बायफचे पाणलोट विकास क्षेत्रातील काम आर्थिक स्वावलंबन मिळवून देणारे शेतीचे प्रयोग अशी वनवासी भागातील विविध कामे नंतरच्या दुसऱ्या टप्प्यात गटाने पाहिली.

यातील कुठल्याही एका प्रकल्पासंबंधी सविस्तर माहिती सांगायची तरी काही पाने लिहावी लागतील. सगळ्यांमधील काही सामाईक गोष्टींचा गटावर झालेला परिणाम जाणवणारा होता. वनवासी बांधवांच्या हलाखीच्या परिस्थितीवर आपापल्या परीने उत्तरे शोधणारे, धडपडणारे, त्या भागातील मातीत घट्ट पाय रोवून काम करणारे कार्यकर्ते, त्यांचा कमालीचा साधेपणा, आपण करीत असलेले काम हे आपण काही विशेष करीत नसून ते करणे हा सहज स्वभावधर्म आहे म्हणून आपण करीत आहोत अशी कामामागची त्यांची सहज भावना, शिक्षण आणि अंगी असलेल्या पात्रतेमध्ये खूप काही स्वत:करिता सहज करू शकतील, मिळवू शकतील अशी परिस्थिती असताना मुद्दामहून ठरवून काही विशिष्ट पध्दतीने जगण्याची त्यांनी दाखविलेली जिद्द, जगण्यासाठी हेतू सापडल्यावर प्रतिकूल परिस्थितीतही हसत हसत कसं राहता येतं हे त्यांनी जाता जाता सांगितलेले त्यांच्या संपूर्ण कामामागचे सूत्र, या सगळ्या गोष्टी मनावर ठसत होत्या.

गप्पांमधून त्यांचा प्रत्येकावर झालेला परिणाम जाणवत होता.

सूत्रकार पाड्यावरील श्री. अंधेर गुरूजी यांच्या अनुभवांनी हलून गेलेल्या मनांना अस्वस्थता जाणवत होती. वयाच्या बाराव्या वर्षी प्रथम शाळेत पाऊल टाकलेल्या अंधेरी गुरूजींनी, हात-पाय काम करीत नसतानाही, ४० वर्षे सतत उपासलेल्या कामाचा डोंगर, त्यांच्या कथनातून आणि मन:पूर्वक हास्यातून, गटाबरोबर पुण्यापर्यंत पोहोचलेली त्यांची व्यक्तिरेखा, मुलींच्या बोलण्यातून डोकावत होती.

श्री. भास्कर सावे यांचे नैसर्गिक शेतातील प्रयोग, अठ्ठ्याहत्तराव्या वर्षीही सतत कार्यरत असणारे त्यांचे हात, त्यांच्या शेतातील शहाळ्याचे पाणी पिण्याकरिता पपईच्या पानाचे त्यांनी करून दिलेले स्ट्रा, हेही श्री. अंधेरी गुरूजींसारखे पुण्यापर्यंत आणि आता गावोगावी पोहोचले आहेत.

मागील वर्षी ठाणे वनवासी दौऱ्यातील आम्ही सगळ्या, कुठेही भेटलो की एकच ठरवतो, पुढच्या अभ्याससहलीला केव्हा जाऊयात? आपला देश, त्यातील माणसं, त्यांचे प्रश्न, त्यावर उत्तर शोधणारे कार्यकर्ते हे सर्व केव्हा जवळून पाहूयात?

केव्हातरी आपणही देशाच्या एखाद्या भागात, एखाद्या प्रश्नावर उत्तर शोधून, दटून कामाला उभे राहिलेले असू अन् मग आपलंही काम पाहायला कोणीतरी येईल अशी स्वप्न पाहण्यामध्ये आम्हीही स्वत:ला विसरून जातो.


●●

**सौ. बागेश्री पोंक्षे**
रघुराज सोसो; सिंहगड रस्ता,पुणे ५१


शूर अम्ही हो वारस ज्यांची रणि मर्दुमकी अनिवार, ज्यांनि रोविले निशाण अपुले दूर दूर अटकेपार.

# ईश्वरचंद्रांची मातृभक्ती

सुरेश करंदीकर



***विधवा विवाह ही कल्पना ज्या काळात महापाप समजली जात होती, त्या काळात ईश्वरचंद्रांनी या विषयावर पुस्तक प्रकाशित केले. त्यासाठी धर्मशास्त्राचा सूक्ष्म अभ्यास केला. त्यात त्यांना विधवा विवाहाला अनुकूल असे उल्लेख सापडले. सनातनी पंडितांच्या प्रश्नांना त्यांनी अचूक उत्तरे दिले. सामाजिक प्रश्नाबाबत अतिशय जागरूक असलेले ईश्वरचंद्र, आपल्या आईबाबत अतिशय हळवे आणि संवेदनशील होते. त्यांची मातृभक्ती मन हेलावून टाकणारी होती. अशा ईश्वरचंद्रांच्या मातृभक्तीविषयी वाचूया डॉ. सुरेश करंदीकर यांच्या लेखात.***

'ईश्वरचंद्र विद्यासागर' हे नाव तुम्ही अनेकदा ऐकले असेल. बंगालमधील सुप्रसिध्द संस्कृत पंडित, म्हणून त्यांची ख्याती होती. ते एक थोर समाजसेवक होते. ' विधवाविवाहाच्या कायद्याचे जनक' म्हणून ईश्वरचंद्राचा लौकिक होता. ते हाडाचे शिक्षक होते. शिक्षणक्षेत्रात विद्यासागरांनी लक्षणीय कामगिरी बजावली. बंगालमध्ये स्त्री शिक्षणासाठी त्यांनी प्रयत्नाची पराकाष्ठा केली. मुलींसाठी अनेक शाळा काढल्या. ईश्वरचंद्र विद्यासागरांचे व्यक्तिमत्व अतिशय विलोभनीय होते. ईश्वरचंद्र हे नीतिमान, साधे आणि निर्भय होते. ते पराकोटीचे मातृभक्त होते. त्यांच्या रक्तात परोपकारी वृत्ती भिनली होती. आपल्या सुरूवातीच्या आयुष्यात, त्यानी शिक्षकापासून प्राचार्यापर्यंतची भूमिका, अत्यंत उत्तमप्रकारे पार पाडली.

कलकत्त्याच्या फोर्ट विल्यम कॉलेजमध्ये ईश्वरचंद्र, इंग्रजी व हिंदी विषय शिकवित असत. एकदा घरून त्यांच्या आईचा निराप आला,'तू इकडे निघून यावेस.' त्यांचे प्राचार्य, मार्शल नावाचे युरोपियन गृहस्थ होते. त्यांनी ईश्वरचंद्रला रजा देण्याचे नाकारले; आणि घरून तर आईचा तातडीचा निरोप आला होता. काय करावे? असा विचार ईश्वरचंद्रानी मनात केला आणि राजीनामा देऊन तडक गावी जाण्यास निघाले. या प्रसंगाने त्यांहच्या मनात विचारांचे काहूर उसळले होते.

त्या दिवशी निसर्गही त्यांच्याप्रमाणे प्रक्षुब्ध झाला होता. आभाळातून प्रचंड पाऊस कोसळत होता. हवेत खूपच गारठा होता. दामोदर नदी, दुथडी भरून वाहत होती. संध्याकाळ झाल्यामुळे सगळीकडे काळोख पसरला होता. नदीतील पाण्याचा खळखळाट अचानक वाढला होता. नदीच्या काठावर एक-दोन होडीवाले होते. पण आपला जीव कोण धोक्यात घालणार? ईश्वरचंद्र नावाड्यास भरपूर पैसे द्यावयास तयार होते. पण त्याचा काही उपयोग नव्हता. या भयंकर प्रसंगात ईश्वरचंद्रांना कोण मदत करणार? अखेर ईश्वरचंद्रांनी त्या रौद्ररूप धारण केलेल्या नदीच्या पाथात ' जय मातादी' म्हणून प्राणांचीही पर्वा न करता उडी मारली!

ईश्वरचंद्रची शरीरयष्टी लोखंडाप्रमाणे कणखर होती. पण त्यापेक्षा तयांचा निश्चय दृढ होता, सामर्थ्य दांडगे होते. पाण्याच्या प्रवाहाशी अत्यंत समर्थपणे झुंज देत देत या तरूणाने नदीचा काठ हां हां म्हणता गाठला ! शरीर पूर्ण गारठून गेले होते. पण त्याची ईश्वरचंद्रना पर्वा नव्हती! नदीतून बाहेर पडल्यावर ईश्वरचंद्रानी धावत धावत आपले घर

गाठले. दारावर थाप मारून 'आई, मी आलोय' असा म्हणत विद्यासागर माता भगवतीसमोर ओल्याचिंब अवस्थेत उभे राहिले! आई,'तू बोलावले होतेस ना, हे पाहा मी आलो आहे' असे म्हणत ईश्वरचंद्रांनी आपल्या आईच्या पायांचे दर्शन घेतले! ' तू नक्की येशीलच, अशी माझी खात्री होती.' माता भगवती म्हणाल्या. संकटाशी सामना देऊन ईश्वर परत आला, हे ऐकून माता भगवतींनी परमेश्वराचे मनोमन आभार मानले.

ईश्वरचंद्र विद्यासागरांचे एक युरोपियन मित्र हॅरिसन, एकदा त्यांच्या गावी आले. माता भगवतींना वाटले की, आपल्या ईश्वरच्या या साहेबमित्रास आपल्या घरी जेवावयास बोलवावे. विद्यासागरांच्या विनंतीनुसार हॅरिसन, आयकर अधिकारी, जेवावयास आले. ईश्वरचंद्र विद्यासागरांच्या घरी कुठली आली टेबलखुर्ची! हॅरिसन साहेब विजार नेसून, मांडी घालून जेवावयास बसले! माता भगवतीदेवी वाढत होत्या आणि चाललेल्या गप्पागोष्टींचे भाषांतर इंग्रजीतून बंगालीत आणि बंगालीतून इंग्रजीत करून, ईश्वरचंद्र आईला सांगत होते आणि आईचे म्हणणे साहेबांपर्यंत पोहोचवत होते.

हॅरिसन साहेबांनी माता भगवती देवींना विचारले,'आपण फार उदार आहात; आपणाजवळ संपत्ती आहे तरी किती?' भगवतींनी तात्काळ उत्तर दिले,'माझ्याजवळ चार रांजण द्रव्याने भरलेले आहेत.' हॅरिसन साहेबांच्या ध्यानात ही गोष्ट आली नाही, तेव्हा ते म्हणाले, ' आपण मला ते दाखवू शकाल काय?' भगवतीदेवींनी मोठ्या अभिमानाने आपल्या सोन्यासारख्या चार मुलांकडे निर्देश केले.' 'ही माझी संपत्ती आहे. हे माझे संपत्तीने भरलेले रांजण आहेत' हे उत्तर ऐकून हॅरिसन साहेब भगवतीदेवींवर बेहद्द खूश झाले. भगवतीदेवींचा निरोप घेताना त्यांनी देवींना नमस्कार केला आणि म्हणाले,' मला आपण मातेसमान आहात. मला आपण काही उपदेशाच्या गोष्टी सांगाल तर, त्याप्रमाणे मी वागण्याचा प्रयत्न करीन.'

माता भगवतीदेवी म्हणाल्या, ' साहेब मी तुमच्यासारख्या मोठ्या माणसांना काय सांगणार? पण साहेब, आज तुमच्या हातात सत्ता आहे. तुम्ही मोठे अधिकारी आहात. सत्तेचा दुरुपयोग तुमच्या हातून न होवो! तुमच्या हातून कोणाचे ही नुकसान होऊ नये. लोकांशी तुम्ही असे वागावे, की तुमचे नाव त्यांच्या स्मरणात कायमचे राहावे.'परदेशातल्या हॅरिसन साहेबांनी, भगवतीदेवींनी केलेला उपदेश आपल्या अंत:करणात कोरून ठेवला आणि त्याप्रमाणे ते वागले. अशा होत्या माता भगवतीदेवी! त्या केवळ ईश्वरचंद्र विद्यासागरांच्या माता नव्हत्या तर त्या जगन्माता होत्या!

ज्या काळात 'विधवाविवाह' हा शब्दही उचारणे कठीण होते, त्या काळात ईश्वरचंद्रांनी पुनर्विवाहाची चळवळ सुरू केली. विधवा विवाहावर ग्रंथ लिहिला. तो ग्रंथ त्यांना प्रसिध्द करावयाचा होता. ईश्वरचंद्र भगवतीदेवींकडे गेले आणि म्हणाले,'विधवा विवाहावरचा हा ग्रंथ मी प्रसिध्द करणार आहे, आई हे तुला धर्म बाह्य वर्तन तर वाटणार नाही ना? तुला दु:ख होणार नसेल, तर तुझ्या आज्ञेने हा ग्रंथ मी प्रसिद्ध करेन.' माता भगवतीदेवी या दयेचा सागर होत्या. अनाथांचा कैवार घेणाऱ्या आपल्या मुलाचा त्यांना विलक्षण अभिमान वाटला. त्या म्हणाल्या, दु:खाचे डोंगर ज्या स्त्रियांना आपल्या जीवनात उचलावे लागतात त्यांच्यासाठी, हे मोठे सत्कृत्य आहे. तू तुझा ग्रंथ जरूर प्रसिध्द कर.' ईश्वरचंद्र विद्यासागरांना आपल्या मातेचे उद्‌गार ऐकून खूप आनंद झाला. विधवा विवाहावरचा ग्रंथ त्यांनी प्रसिध्द केला.

माता भगवतीदेवींच्या अंतकाळी मात्र, दुर्दैवाने विद्यासागर तेथे नव्हते, याची त्यांना आयुष्यभर खंत वाटत राहिली. एकदा मित्रांशी गप्पा मारता मारता आईचा विषय निघाला. ईश्वरचंद्र एकदम कावरेबावरे झाले! आईच्या आठवणींनी त्यांना दु:खाचा आवेग आवरता येईना, ते रडू लागले! या अचानक उद्‌भवलेल्या प्रसंगामुळे, विद्यासागरांचे मित्र एका चमत्कारिक अवस्थेत सापडले. ते म्हणाले, मला क्षमा करा. मी आपणास दु:ख देण्यास कारणीभूत झालो.' ईश्वरचंद्र विद्यासागरांनी आपले दु:ख आवरले आणि ते आपल्या मित्रास म्हणाले,'मी उलट तुमचा आभारी आहे, कारण माझ्या आईच्या स्मृतीने माझ्या डोळ्यांतून अश्रू ओघळले, त्या आसवांनी मी पवित्र झालो.' ●●

**डॉ. सुरेश करंदीकर**
'दयानंद' शिक्षणशास्त्र
महाविद्यालय, सोलापूर.



आई उन्हाची सावली, आई सुखाचे आगार। निळ्या आकाशाएवढा तिच्या मायेचा पदर।

## छात्र प्रबोधनद्वारा एप्रिल– मे मध्ये झालेली व्यक्तिमत्व विकसन शिबिरे

'छात्र प्रबोधन' हे निव्वळ मासिक नाही, हे एव्हाना तुम्हा सर्व वाचकांच्या लक्षात आले असेलच. छात्र प्रबोधनच्या वाचकांच्या सर्वांगीण विकसनादाठी चालू असलेल्या विविध उपक्रमांपैकी 'वासंतिक, व्यक्तिमत्व–विकसन शिबिरे' हा एक महत्त्वाचा उपक्रम! विद्यार्थ्यांना सुट्टीची खरी खुरी मजा लुटता यावी, स्वत:मधील अनेक सुप्त क्षमता, गुणांची त्यांना ओळख व्हावी व ती व्यक्त करण्याची संधी त्यांना मिळावी, स्वत:च्या क्षमता ताणण्याची, अडी–अडचणींच्या प्रसंगांना सामोरे जाण्याची, मानसिक अन् शारीरिक तयारी व्हावी, काही कौशल्ये शिकावीत, काही नवीन माहिती मिळवावी, नवीन अनुभव घ्यावेत, नवनवीन मित्र मिळवावेत, स्पर्धेच्या अवाजवी तणातून मोकळे होऊन, जीवनाकडे पाहण्याचा निकोप–विधायक दृष्टीकोन विद्यार्थ्यांना समजावा, समाजातील विविध यंत्रणांचे, घटकांचे, प्रश्नांचे व त्यावरील संभाव्य उत्तरांचे दर्शन, विद्यार्थ्यांना व्हावे या विविध हेतूंनी या शिबिरांची योजना केलेली असते. यावर्षी १५ मे पर्यंत डोंबिवली, रसायनी, अलिबाग, धाराशिव, कराड, इचलकरंजी, नाशिक येथे अशी शिबिरे झाली. सर्व शिपिरे इ.५ वी ते ९ वी च्या गटासाठी साधारणपणे २० ते ५० च्या उपस्थितीत झाली. जागे अभावी सर्व शिबिरांचे सर्व तपशील येथे जरी देता येत नसले तरी शिबिरातील वैशिष्यपूर्ण उपक्रमांची झलक त्यातून तुमच्यापर्यंत पोहोचेल. अशा शिबिरांची अनुभूती घेणं हाच खरं तर 'शिबिर कसं झालं?' हे समजून घेण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. सर्व शिबिरे स्थानिक कार्यकर्त्यांनी अत्यंत उत्तमरितीने आयोजित केली. त्याबद्दल या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन! पुढील वर्षी तरूण–प्रौढ सदस्यांपैकी अनेकजण आपापल्या गावांमध्ये शिबिरांचे संयोजन करतील व गावोगावच्या विद्यार्थ्यांना अशा शिबिरांमध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देतील, अशी आशा बाळगून आहोत.

इचलकरंजी, नाशिक व अलिबाग येथील शिबिरांचे वृत्त पुढील अंकात येईल. मे अखेरील व जूनच्या पहिल्या आठवड्यात मिळून सांगली, सातारा व धुळे येथे व्यक्तिमत्व विकसन शिबिरे होतील. त्यांचीही माहिती पुढील अंकात येईल.

### धाराशिव– २१ते २५ एप्रिल

सकाळच्या सत्राची सुरूवात योगासने, प्राणायाम, ध्यान, गायत्रीमंत्र, एकात्मता मंत्र, शिख धर्मगुरूंच्या चरित्रांचे वाचन, इ.ने होते असे. त्यानंतर विविध विषयांवरील व्याख्यानांचे एक सत्र रोज व्हायचे. त्यानंतर पदय पाठांतर, छात्र प्रबोधन मासिकाच्या मलपृष्ठावरील गीतांना चाली लावणे, कथा तयार करणे, कल्पना विस्ताराचे खेळ, इलेक्ट्रिक वस्तूंची दुरूस्ती शिकणे, भेटकार्ड, फुले तयार करणे इ. गोष्टी व्हायच्या. एका दिवशी विद्यार्थी, समाजातील वेगवेगळ्या गटातील लोकांच्या मुलाखती घ्यायला बाहेत पडले, तर दोन दिवस विद्यार्थ्यांनी गटागटांना आकाशवाणी, सरकारी साखर कारखाना, पुराण वस्तू संग्रहालयात इ. ठिकाणी अभ्यासपूर्ण भेटी दिल्या. एकूण शिबिर उत्साहवर्धक, आत्मविश्वास वाढवणारे झाले. प्रमुख संयोजक व वक्ते– श्री. सुधीर देशपांडे, श्री. बालाजी माळी, श्री.शेषाद्रि डांगे, श्री मुळे, श्री. वीर, श्री पाठक, श्री. साठे, सौ. पाटील, श्री. वादोने, श्री. पांडव, श्री.रणशूर, डॉ. अनंत राजमाने, श्री विठ्ठल कुलकर्णी, श्री. अत्रे, सौ. शास्त्री, श्री. स्वामी, श्री. मनीष देशपांडे.

### रसायनी– २३ ते २५ एप्रिल

या शिबिरात विद्यार्थ्यांना, विविध शारीरिक–बौद्धिक खेळ शिकविण्यात आले. विद्यार्थ्यांना बोलते करण्यासाठी विविध विषयांवर गटचर्चा घेतल्या गेल्या. हस्तकौशल्य व लेखन कौशल्यातील प्राथमिक पाठ घेण्यात आले. परिसरातील अनेक मान्यवर व्यक्तींची मार्गदर्शनपर अन् रंजक व्याख्याने झाली. त्यामध्ये, ४०० वेळा रायगडवर जाऊन आलेले श्री. सुरेश वाडकर यांचे अनुभवकथन व शिवराज्यअभिषेक सोहळ्याचे त्यांनी केलेले वर्णन, सर्वांच्या दीर्घकाळ लक्षात राहील. शेवटच्या दिवशी आपटा येथील राल्ये स्टेशनला भेट देऊन तेथील सिग्नलिंग व कन्ट्रोलिंगचे कामकाज प्रत्यक्ष पाहिले. मुलांनी अनेक प्रश्न विचारून स्टेशनमास्तर श्री. माने यांच्याकडून विपुल माहिती मिळविली. शिबिर छान झाले.

प्रमुख संयोजक व वक्ते– श्री. व सौ. कोकीळ, श्री. सराफ, श्री. पिंगळे, श्री. पाटील, श्री. मालगावकर, सौ. सहस्त्रबुद्धे, मुख्याध्यापक श्री. देशपांडे, श्री. होनावळेसर, डॉ. रानडे, रिलायन्स इंडस्ट्रिजचे जनरल मॅनेजर श्री. सगणे, श्री. सुरेश वाडकर, श्री. ओंकार, सौ. करंदीकर.

### कराड– २६ ते २८ एप्रिल

विविध खेळ, हस्तकौशल्ये शिकवली. कचऱ्यातून कला, चित्रकला, मेंदीकाम, मातीच्या वस्तू–मुर्ती बनविणे, ही कौशल्ये मुलांनी मोठ्या उत्साहाने शिकून घेतली. व्यक्तिमत्व विकसनाशी निगडीत विविध विषयांवरील तंज्ज्ञांची व्याख्याने झाली. कृष्णाई दूध डेअरी, जनकल्याण पतसंस्था व फिनिक्स संगणक केंद्र, वेथील भेटीही सर्वांना भरपूर माहिती देऊन गेल्या. शेवयच्या दिवशीची मुर्लींच्या घाटातील सायकल सहल, हे मुलांचे खरे आकर्षण होते. जिऑलॉजीचे प्राध्यापक डॉ. उमर्जीकर, सहलीला बरोबर आल्याने, त्यांनी डोंगर–दऱ्या, खडक निसर्ग इ. बाबत रंजक अन् खूप विविधांगी माहिती सांगितली. करवंदांचा आस्वाद घेत सहल खूपच छान पार पडली. समारोपाच्या कार्यक्रमाचे संचालन मुलांनीच अत्यंत नेटकेपणाने केले.

**प्रमुख संयोजक व वक्ते–** श्री. व सौ. नावडीकर, श्रीमती. पेंडसे, श्री. रामचंद्र कुलकर्णी, श्री. नरेंद्र कुलकर्णी, कु. मनीष खुडे, प्राचार्य डॉ. उमर्जीकर, सौ. विजया भाटे, डॉ. मिलिंद पेंढारकर, श्री. विद्याधर म्हैसकर, प्रा. दरूरे, श्री. शेखर देशपांडे, निवृत्त ले.ज.एम्. डी. कुलकर्णी, कु. अवंती पानसकर.

डोंबिवली येथे २३ ते २५ एप्रिल या काळात झालेल्या निवासी शिबिराच्या आठवणी-शाळेनेच विद्यार्थ्यांना पत्र पाठवून कळवल्या आहेत! शाळेच्या भूमिकेत पत्र लिहिलंय प्रमुख संयोजिका सौ. अश्विनी मयेकर यांनी.

**माझ्या प्रिय मित्रमैत्रिणींनो,**

राम राम! तुमची माझी ओळख अवघी २-३ दिवसांची, पण एवढ्या कमी वेळातही इतका जीव लावलात की तुमचं शिबिर संपल्यावर मलाच करमेनासं झालं. त्यातच माझे नेहमीचे सवंगडीही उन्हाळ्याच्या सुट्टीमुळे भेटत नाहीत. तेव्हा म्हटलं, तुमच्याशीच पत्रातून गप्पा माराव्यात. अरेच्या! अजून ओळखलं नाहीत का मला? मी शाळा! हो...हो. तीच 'सखारामशेठे विद्यालय.'

खूपच छान झालं हं तुमचं शिबिर! अशा गमतीजमतीच्या खेळातूनही खूप काही शिकता येतं, हे मलाही नव्यानेच कळलं. तुमचे काही खेळ, काही सत्र तर माझ्या विशेषच लक्षात राहिली. अगदी पहिल्याच दिवशी, माझ्या आवारात उपलब्ध असलेल्या वस्तूंतून गटागटाने तुम्ही तयार केलेली विविध सणांची चित्रं! तुमच्या कल्पकतेला दाद द्यावी तेवढी थोडीच! कुणी दिवाळी साजरी करत होतं तर कुणाकडे गुढी उभारली जात होती; कुणी गणपती आणत होते तर कुणी गणरायाला विसर्जनाला नेत होते, कुणी होळीत दंग तर कुणी दहीहंडी फोडण्यात मग्न!

चिठ्ठ्यांच्या खेळातही खूप धम्माल आली नाही! तुमच्या ताईकंपनीने चिठ्ठ्या किती शक्कल लढवून तयार केल्या होत्या! आणि त्या लपविण्यासाठी जागाही नामी शोधून काढल्या होत्या. मला तर प्रश्न पडला की माझी ही छोटी दोस्त मंडळी कशी शोधतील या भन्नाट जागच्या चिठ्ठ्या? पण गड्यांनो, तुम्ही तर गोड धक्काच दिलात मला! वानरउड्या मारत मारत सगळ्या चिठ्ठ्या शोधून काढल्यात की!

या खेळापेक्षा थोडा वेगळा, म्हणजे सुरूवात गमतीने होऊनही तुम्हाला बरंच काही शिकवूद गेलेला खेळ 'अंधानुभव'! डोळ्याशिवाय वावरणं, छोटी छोटी कामं करणंही किती अवघड असतं अन् अंध माणसं किती सहजतेने सर्व कामं करत असतात, याची जाणीव या खेळाने तुम्हाला करून दिली, नाही का?

घारपुरेबाईंच्या कथाकथनातून मूर्तिमंत इतिहास डोळ्यांसमोर उभा राहिलाच, शिवाय कसं करावं कथाकथन? याचा वस्तुपाठही तुम्हाला मिळाला. शिवाजी महाराज, झाशीची राणी यासारख्या व्यक्तींपासून प्रेरणा घेउन तुम्हीही आपल्या मातृभूमीसाठी कार्य कराल, असा विश्वास वाटतो.

'चुलीवरचा स्वयंपाक' हा तुम्ही मंडळांनी सादर केलेला सर्वात मनोरंजक कार्यक्रम! चूल कशी मांडायची? याची तुम्हा शहरातल्या मुलांना कल्पना नसताना आणि त्यात भर म्हणून की काय! दिवेही गेलेले असताना ही मुलं कशी काय स्वयंपाक करतील? असं मला वाटत होतं पण तुमच्यातल्या उदंड उत्साहाने सर्व अडचणींवर मात केली. जमेल तितका चांगला स्वयंपाक करून विनातक्रार तो संपवलाही. दोस्तांनो, एक पदार्थ बनवताना तुमची इतकी दमछाक झाली. मग आई तुमच्यासाठी वेगवेगळे पदार्थ कात असताना किती दमत असेल नाही का? मग करणार ना तिला मदत?

अरे हो... स्वयंपाकावरून आठवलं. तुम्ही जेवणापूर्वी 'वदनि कवळ घेता ...' हा श्लोक म्हणत होतात, तो किती अर्थपूर्ण होता नाही? नेहमीच्या श्लोकापेक्षा वेगळा... आता घरी गेल्यावरही म्हणताय ना हो श्लोक?

रोजची सकाळची योगासने, सूर्यनमस्कार अन् धीरगंभीर आवाजातली ओंकार-शिवमंत्राची उपासना, याने दिवसाची सुरूवात किती छान व्हायची. शिवाय एक दिवशी झालेली क्रॉसकंट्रीची शर्यत अन् त्यानंतरचे बरची नृत्य, त्यामुळे तुम्ही किती दमला होतात, तेही चांगलंच आठवतंय. दुपारच्या वेळी केलेले पाठांतर, म्हटलेली छान-छान गाणी, गटचर्चेमध्ये प्रत्येकानेच हिरीरीने घेतलेला सहभाग, ओरिगामीतून तयार कलेले उडणारे पक्षी, सगळं कसं अगदी डोळे भरून पाहिलंय! कान भरून ऐकलंय, म्हणूनच कसं तपशीलात आठवतंय! तुम्हालाही आठवतंय ना! आणि हो, माझ्या शेजारी असलेल्या वीटभट्टीवरही तुम्ही गेले होता ना? परत आल्यावर तुम्ही विटा कशा तयार करतात, विभट्टीवर काम करणाऱ्यांना कसं स्थलांतरित व्हावं लागतं, त्यांच्या कुटुंबांतील प्रश्न, मुला-मुलींच्या शिक्षणाची होत असलेली आबाळ, सगळं रंगवून अन् तरी अस्वस्थ होऊन तुम्ही सांगत होतात. खरंच यांच्यासाठी काहीतरी केलं पाहिजे, नाही!

दोस्तांनो, मैदानी खेळही तुम्ही तेवढ्याच उत्साहाने खेळलात , स्पर्धेतही अगदी हिरीरीने भाग घेत होतात आणि एकमेकांशी इतकी दोस्ती झाली होती तुमची, की तुम्ही नव्यानेच भेटताय असाही संशय कोणाला येऊ नये. वेगवेगळ्या गटांच्या स्पर्धाही चुरशीने पार पाडल्यात. प्रत्येक गटाने वर्गाची सजावटही छान केली होती. मला अगदी प्रसन्न वाटत होतं. तुमच्या रूपाने जणू चैतन्यच वस्तीला आलं होतं. अशा गोकुळासारखी गजबज राहावी असं वाटत असताना तुमच्या निरोपाचा क्षण येऊन ठेपला. मी तुमच्यासारखी माणूस असते ना, तर गळामिठीच घातली असती.

चला तर, निरोप घेते आता. असेच दरवर्षी शिबिराच्या निमित्ताने का होईना, मला भेटायला या. या शिबिरातलं वर्षभर काय काय टिकवलंत? कोणकोणते गुण वाढवलेत? हे सारं सांगायला या. तुमच्या छात्र प्रबोधनच्या ताई-दादांनाही विचारलंय सांगा. त्यांच्यामुळेच तर आपली ओळख झाली, खरं ना?

तुमची नवीन (अनोखी) मैत्रिण

**शाळा.**

## छात्र प्रबोधन – सभासद नोंदणीपत्रक

नवीन सभासद / जुना सभासद

जुना सभासद क्रमांक : दिनांक :

सभासदाचे नाव :

संपूर्ण पत्ता :

दूरभाषा क्रमांक : जन्मदिनांक : / /

शाळा : इयत्ता-तुकडी

**घरी अंक केव्हापासून येतो –** नव्यानेच/एक वर्ष/दोन वर्ष/पाच वर्ष/सहा वर्ष

**कार्यालयीन कामासाठी**

वर्गणीचा कालावधी : वर्ष अंक ते वर्ष अंक

पावती क्रमांक : नोंदणी क्रमांक : स्थान क्रमांक :

वर्गणी : वार्षिक/द्वैवार्षिक/त्रैवार्षिक/आजीवन दीपावली विशेषांक रजिस्टरने पाठविणे : हो/नाही

## व्यावहारिक कौशल्य चाचणी – ३

| | | गुण |
|---|---|---|
| १. | बँकेमध्ये धनादेश/रोख रक्कम, खात्यामध्ये भरता येणे/काढता येणे. | २. |
| २. | पाचजणांना पुरेल एवढी मुगाच्या डाळीची खिचडी करता येणे. | २ |
| ३. | उसवलेल्या कपड्यांना शिलाई मशीनवर व हाताने टीप मारता येणे. | २ |
| ४. | रेल्वेचे कोणत्याही प्रवासासाठी आरक्षण करता येणे व एखादे तिकिट रद्द करता येणे. | ३ |
| ५. | प्रत्येकी १० प्रकारच्या पालेभाज्या, शेगभाज्या, कंदभाज्या ओळखता येणे. | ३ |
| ६. | नारळाच्या शेंड्या काढून नारळ फोडता येणे. | १ |
| ७. | गॅस सिलेंडर बदलता येणे व गॅसची शेगडी (बर्नर ) साफ करता येणे. | १ |
| ८. | तापाने आजारी असलेल्या माणसाचा ताप व नाडीचे ठोके मोजता येणे. | १ |
| ९. | घरातील फ्रीज, पंखा, दूरदर्शन संच, आतून-बाहेरून स्वच्छ करता येणे. | २ |
| १०. | पाणीपट्टी/घरावरील कर अथवा नगरपालिका हद्दीतील अन्य कर भरता येणे. | ३ |

आत्तापर्यंत ३ अंकामध्ये मिळून एकूण ३० गोष्टींची यादी आपण दिली.त्यापैकी किती तुम्ही करून पाहिल्या?व्यवहारातील विविध गोष्टी तुम्हाला उत्तमरितीने येण्यासाठी तुमच्या शिक्षणाचा उपयोग तुम्ही करायला हवा. अन्यथा खूप शिकूनही, व्यवहारातल्या बारीक-सारीक गोष्टींसाठी तुम्ही अडून बसाल. स्वावलंबी अन् आत्मविश्वासपूर्ण व्यक्तिमत्व बनण्यासाठी, ही चाचणी एक निमित्त आहे.

एकूण ३ चाचण्यामध्ये ६० गुणांपैकी ५० पेक्षा अधिक गुण व ३० पैकी किमान २५ गोष्टी उत्तमरितीने जमत असतील, अशा विद्यार्थ्यांनी त्यांना जमत असलेल्या व किमान एकदा तरी प्रत्यक्ष केलेल्या गोष्टींची यादी लिहून व त्यावर तुमची,आईची व वडिलांची स्वाक्षरी घेऊन, तो कागद ३० जूनपर्यंत छात्र प्रबोधनच्या कार्यालयात पाठवा. स्वत:चे संपूर्ण नाव,पत्ता,इयत्ता लिहायला विसरू नका. यशस्वी विद्यार्थ्यांना आकर्षक बक्षिसे पाठविली जातील.

| कुटुंबासंबंधी माहिती | | | | |
|---|---|---|---|---|
| | नाते | नाव | शिक्षण | व्यवसाय / जन्मतारीख |
| १. | आई | | | |
| २. | वडील | | | |
| ३. | भाऊ | | | |
| ४. | बहीण | | | |
| ५. | | | | |
| ६. | | | | |
| ७. | | | | |

**आपल्या घरी यापैकी काय काय आहे? :** फ्रीज/टि.व्ही./व्ही.सी.आर./केबल/कॉम्प्युटर/फोन
स्कूटर/कार/जीप/टेपरेकॉर्डर/स्टिरिओ सिस्टिम/पेटी/तबला/सतार

**तुम्ही मिळविलेली बक्षिसे/विशेष यश/तुमचे विशेष छंद**

(जागा कमी पडल्यास याच आकाराचा स्वतंत्र कागद जोडावा.)

**● कार्यालयीन कामासाठी ●**

**अर्ज कोणाकडून आला :** पोस्टाने/केंद्राकडून/कार्यालयात समक्ष केंद्राचे नाव :

## जूनमध्ये घ्यावयाचा कार्यक्रम : वर्षारंभ समारंभाचे आयोजन

सुट्टी संपवून विद्यार्थी, नवीन शैक्षणिक वर्षाला प्रारंभ करतात. नवीन वर्ग, नवीन वह्या, नवीन पुस्तके, काही नवीन शिक्षक, या सगळ्याची नवलाई पहिले काही दिवस टिकते अन् मग वाढीव अभ्यास सोडला तर शाळेतली बहुतेक सर्व वर्षे एक सारखीच पुढे पुढे सरकत असतात. त्यामध्ये यावर्षी काहीतरी विशेष करूया, ठरवून करूया, काही भव्य दिव्य, पराक्रम करून दाखवूया, अशी ऊर्मी मुलांच्या मनामध्ये निर्माण करावी लागते. त्यासाठी हा वर्षारंभ समारंभ. यासमारंभाचे गांभीर्य मुलांच्या मनावर ठसावे, प्रसन्न-मंगल-पवित्र अशा वातावरणात विद्यार्थ्यांना काही व्यक्तिगत अन् काही सामूहिक संकल्पांचा पाठपुरावा व्हावा, अशी यामागची कल्पना. त्यादृष्टीने ज्ञान प्रबोधिनीने 'वर्षारंभ समारंभा'ची एक उपासना तयार केली आहे. त्यामध्ये ॐ कार,सरस्वतीवंदन,गुरूवंदन यासाठी योग्य श्लोक,अभंग याची अर्थासह मांडणी केली आहे. संकल्पयुक्त प्रार्थना,ध्यान अन् गायत्रीमंत्राचाही त्यामध्ये समावेश आहे. (ही वर्षारंभ उपासनेची पोथी,छात्रप्रबोधनच्या मुख्य कार्यालयात १० रू. ला (पोस्टेज खर्चासह) उपलब्ध आहे.) उपासनेनंतर विद्यार्थ्यांनी, प्रतिनिधिक स्वरूपात आपापले संकल्प सांगावेत. योग्य, अधिकारी व्यक्तिने आशिर्वादपर बोलून समारंभाची सांगता करावी. संकल्पांचा वर्षभरात ४-६ वेळा, गप्पांमध्ये, वैयक्तिक भेटीत व एकत्रितपणेही आढावा घ्यावा. सामूहिक संकल्प ठळकपणे वर्गात, कार्यालयात लिहून ठेवावेत. परिसरातील अधिकाधिक शाळांमध्ये हा कार्यक्रम होईल व तो निव्वळ उपचार न होता अर्थपूर्ण होईल यासाठी प्रयत्न करावेत.

हे मासिक, ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकिचे असून मुद्रक, प्रकाशन व संपादक प्रा. महेंद्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ११ ज्येष्ठ, शके १९२१, १ जून १९९९ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातुबाग, पुणे येथून प्रसिध्द केले.

# वर्षारंभ उपासनेमधील संकल्पयुक्त प्रार्थना

'राष्ट्रार्थ भव्य कृति काही पराक्रमाची
ईर्ष्या निजांतरी धरूनि करावयाची'
खरोखर राष्ट्रहितार्थ
जीवनात पराक्रमाची उत्तुंग कृती घडावी,
अशी तीव्र तळमळ मनात धरून,
या शैक्षणिक वर्षाच्या आरंभी
आम्ही एकत्र जमत आहोत.
या शैक्षणिक वर्षात पूर्ण करण्याचे संकल्प
आज आम्ही सर्वांसमोर मांडत आहोत.
हे परमात्मन, तू याचा साक्षी हो.

आमच्या दैनंदिन जीवनात
आम्ही उत्तम अभ्यास करू.
उत्तम वाचन करू, उत्तम चिंतन करू.
विविधांगी अनुभव उत्कटपणे घेऊ,
खूप खेळ खेळू, शरीर सुदृढ करू, काटक करू.
शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि आत्मिक
सर्वप्रकारे आम्ही कार्यक्षम होऊ.

आई-वडील अन् शिक्षकांबद्दल
नितांत आदर बाळगून,
त्यांच्याकडून अधिकाधिक विद्या अन् संस्कार
आम्ही ग्रहण करू.
वर्गमित्रांचे गुणग्रहण करत,
परस्परांमधला विश्वास अन् स्नेह वाढवू.
स्पर्धा अन् सहकार्य यांचा उत्तम मेळ घालू.

देशस्थितीचा नित्य अभ्यास करू.
चांगल्या गोष्टींचा आम्ही आग्रह धरू.
समाजोपयोगी कामांमध्ये सहभागी होऊ.
अयोग्य व अन्याय्य गोष्टींचा
धैर्याने प्रतिकार करू.

आमचा देश जागृत व्हावा,
कर्तृत्वाने, पौरुषाने चमकावा,
विद्या, संपत्ती आणि नीती यांनी समृद्ध व्हावा,
यासाठी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात
आम्ही संघटना घडवू.
आमची मने संघटनेला आवश्यक अशी
लवचिक अन् जुळवून घेणारी,
परस्परांना प्रेमाने बांधणारी,
अन् एकत्रितपणे कर्तृत्वाची स्वप्ने पाहणारी,
अशी होवोत.


श्री रामचंद्र अन् सीतामाईपासून
मातोश्री जिजाबाई आणि श्री शिवछत्रपती यांच्यापर्यंत
आणि आजच्या काळात ज्यांनी संसार करूनही
राष्ट्रकल्याणार्थ देह वाहिले,
त्यांचे आदर्श आम्हासमोर असोत.

सर्वसंगपरित्यागावर आरूढ होऊन
ज्यांनी धर्मसेवा आणि ईशसेवाव्रतासाठी
संन्यासधर्माचे आचरण केले;
असे आद्यशंकराचार्य आणि विवेकानंद
यांच्यासारखेही आदर्श आमच्यासमोर असोत

या दोन प्रकारच्या आदर्शांच्या प्रकाशात
आमचीही जीवने उजळून निघू देत

आमच्या प्रयत्नांनी अन् वडिलधाऱ्यांच्या आशीर्वादांनी
आम्ही केलेले व्यक्तिगत व सामूहिक संकल्प
आम्ही निश्चितच पूर्ण करू.
आमचा कण न् कण आणि क्षण न् क्षण
संकल्पपूर्तीसाठी सार्थकी लागू दे!
हे परमेश्वरा! तुझ्या मंगल आशीर्वादाने
हे सर्व घडू दे!

नोंदणी क्रमांक : PHM/22VIII/1997, टपाल नोंदणी क्र. छात्र प्रबोधन; PNCW/349, तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र.- L 128



# चन्दन है इस देश की माटी

चन्दन है इस देश की माटी, तपोभूमि हर ग्राम है ।
हर बाला देवी की प्रतिमा, बच्चा-बच्चा राम है ॥

हर शरीर मन्दिर सा पावन,
हर मानव उपकारी है,
जहाँ सिंह बन गये खिलौने,
गाय जहाँ माँ प्यारी है ।
जहाँ सबेरा शंख बजाता, लोरी गाती शाम है ॥१॥

जहाँ कर्म से भाग्य बदलते,
श्रम निष्ठा कल्याणी है,
त्याग और तप की गाथाएँ,
गाती कवि की वाणी है ।
ज्ञान यहाँ का गंगा जल सा, निर्मल है अविराम है ॥२॥

इसके सैनिक समरभूमि में,
गाया कर... गीता हैं,
जहाँ खेत में हल के नीचे,
खेला करती सीता है ।
जीवन का आदर्श यहाँ हर, परमेश्वर का धाम है ॥३॥

**संपर्क पत्ता :**
संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ,
पुणे 411030. ☎ (०२०) ४४७७६९१/४४७८०९५
**कार्यालयाची वेळ** : स. १० ते संध्या. ७
**या अंकाची किंमत** : रु. १०/-
**वार्षिक वर्गणी** : रुपये १२५/-
**प्रकाशन दिनांक** : सौर ११ ज्येष्ठ, शके १९२१
१ जून १९९९